७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. १८ जून २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# ऑपरेशन टायगर फुलप्रूफ

## तांत्रिक बाबींमुळे पुरावे दिले नाहीत, ठाकरेंचे डावपेच बघूनच पुढचे पाऊल; शिंदेंच्या शिवसेनेचा दावा, सूत्रांची माहिती

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेनेचं ऑपरेशन टायगर हे यशस्वी झालं असून काही तांत्रिक अडचणींमुळे त्याचे पुरावे समोर आणले नाहीत, मात्र ठाकरेंचे कायदेशीर डावपेच बघूनच पुढची पावलं टाकली जातील, असं शिंदेंच्या शिवसेनेच्या गोटातून सांगण्यात आलं आहे. तशी माहिती सूत्रांनी दिली. येत्या दोन दिवसात तरी अधिकृतरित्या काहीही समोर आणलं जाणार नाही, अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली.

राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा खासदार फुटल्याचा दावा केला जात आहे. या सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना सह्यांचं पत्र दिलं असल्याचीही चर्चा होती. मात्र त्याचवेळी शिंदेंच्या शिवसेनेकडे सहा खासदार गेले नाहीत, दोन खासदारांनी पाठिंब्याच्या पत्रावर सह्या केल्या नाहीत, असा विश्वास ठाकरेंच्या शिवसेनेकडून व्यक्त करण्यात आला. ऑपरेशन टायगर झालं असेल तर त्याचे पुरावे काय? तृणमूल काँग्रेसच्या फुटीर खासदारांप्रमाणे शिवसेनेच्या खासदारांचे फोटो का समोर आले नाहीत? तसेच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना त्यांनी जर पत्र दिलं असेल तर ते समोर का आणलं जात नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या पार्श्वभूमीवर शिंदेंच्या शिवसेनेच्या सूत्रांनी एबीपी माझाला माहिती दिली. आज झालेले ऑपरेशन टायगर हे फुलप्रुफ असून त्यात काहीही अडचण नाही. त्याबाबत मात्र आता लगेच काहीही जाहीर करायचं नाही, कोणतेही पुरावे समोर आणायचे नाहीत असं शिंदेंच्या शिवसेनेनं ठरवलं आहे. यामागे काही तांत्रिक गोष्टी आहेत. ठाकरे गट काय कायदेशीर डावपेच आखतो त्यावर पुढची पावलं टाकली जातील असं शिंदेंच्या शिवसेनेनं म्हटलं आहे.

त्यामुळे ऑपरेशन टायगरवर पुढील दोन दिवस तरी काहीही अधिकृतरित्या समोर आणलं जाणार नाही अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली.

दरम्यान, ठाकरेंच्या शिवसेनेकडून संसदीय दलाची बैठक बोलावण्यात आली आहे. ही बैठकच खासदारांची एकनिष्ठतेची लिटमस टेस्ट ठरणार आहे. गुरुवारी सकाळी 11 वाजता नवी दिल्लीत ही बैठक पार पडणार आहे. शिंदेंसोबत सहा खासदार नसल्याचा विश्वास ठाकरेंच्या शिवसेनेला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ठाकरेंच्या शिवसेनेकडून सर्व खासदारांना व्हीप जारी करण्यात आला आहे. गुरुवारच्या बैठकीत किती खासदार आणि कोणते खासदार येतात यानंतरच ठाकरेंच्या शिवसेनेची पुढील भूमिका ठरणार आहे. सहापैकी दोन खासदारांनी त्यांची आश्वासनं पूर्ण झाली नसल्याने सहीच केली नसल्याचा दावा ठाकरेंच्या शिवसेनेकडून करण्यात येतोय.

### कोणते खासदार फुटले?

1. संजय जाधव (परभणी)
2. संजय देशमुख (यवतमाळ- वाशिम)
3. नागेश पाटील आष्टीकर (हिंगोली)
4. ओमराजे निंबाळकर (धाराशिव)
5. भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी)
6. संजय दीना पाटील (ईशान्य मुंबई)



# गोव्यात शिवसेना ३० जागांवर लढणार; युतीचा विचार नाही : कीर्तिकर

**पणजी (दै. संध्या)**

गोवा विधानसभेच्या आगामी निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) 30 मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करण्याच्या तयारीत असून त्यासाठी पक्षाने संघटनात्मक बांधणीला वेग दिला आहे. गोव्यातील भाजप सरकार विविध क्षेत्रांत अपयशी ठरल्याचा आरोप करत सध्या तरी भाजपसोबत युती करण्याचा कोणताही विचार नसल्याचे शिवसेना नेते, माजी खासदार आणि माजी मंत्री गजानन कीर्तिकर यांनी स्पष्ट केले. पणजी येथे बुधवारी (दि.१७) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी गोवा संपर्कप्रमुख सुभाष सावंत, समन्वयक अरुण मोरे, राज्य प्रमुख उपेंद्र गावकर, सरचिटणीस काशिनाथ मयेकर, उत्तर गोवा प्रमुख सुनील सांतिनजकर यांच्यासह पक्षाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

कीर्तिकर म्हणाले की, 19 जून रोजी शिवसेनेचा वर्धापन दिन असून 'शिवसंपर्क अभियान' राबवून सदस्य नोंदणी सुरू आहे. या अभियानाला गोव्यातील 30 मतदारसंघांत चांगला प्रतिसाद मिळत असल्याने पक्षाने 30 जागांवर निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या पक्षाची भूमिका 'एकला चलो' अशी असली तरी भविष्यात पक्षश्रेष्ठींनी युतीबाबत निर्णय घेतल्यास त्यानुसार पुढील भूमिका ठरवली जाईल, असेही त्यांनी सांगितले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


# पंतप्रधानपदी मोदी आहेत तोपर्यंत भारत मोठी भूमिका बजावत राहील : ट्रम्प

**मुंबई (दै. संध्या)**




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भरभरून कौतुक केले. फ्रान्समधील एव्हियन-ले-बॅन्स येथे आयोजित जी-७ (G-7) परिषदेदरम्यान ट्रम्प यांनी पीएम मोदींचे वर्णन शांत, संयमी आणि जबरदस्त असे केले आहे. तसेच, "मी त्यांच्यासारखा नाही," असेही त्यांनी नमूद केले. जी-७ परिषदेतील एका वर्किंग लंचदरम्यान जगभरातील राष्ट्रप्रमुख उपस्थित होते, तिथे ट्रम्प यांनी पीएम मोदींच्या दिशेने इशारा करत त्यांची प्रशंसा केली. लंच दरम्यान ट्रम्प पीएम मोदींबद्दल म्हणाले, "मी पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखा शांत, संयमी आणि जबरदस्त नाही... जरा त्यांच्याकडे पाहा." पश्चिम आशियामध्ये भारताने कोणतीही भूमिका बजावावी अशी अपेक्षा आहे का, असे विचारले असता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, "हो, नक्कीच. मला वाटते की प्रत्येक गोष्टीत भारताची मोठी भूमिका असते. जोपर्यंत ते (पंतप्रधान नरेंद्र मोदी) नेते आहेत, तोपर्यंत भारत मोठी भूमिका बजावत राहील." यापूर्वी मंगळवारी, फ्रान्सच्या एव्हियनमध्ये जी-७ परिषदेच्या आऊटरीच सत्रादरम्यान पीएम मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची भेट झाली होती. दोघांनी एकमेकांना अभिवादन केले. ट्रम्प आणि मोदी यांनी हस्तांदोलनही केले, मात्र पूर्वीसारखीचा आपलेपणा या भेटीत दिसून आला नाही. दुसऱ्या कार्यकाळात ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. ट्रम्प भारताच्या विरोधात सातत्याने वक्तव्ये करत आहेत. त्यांनी आधी टॅरिफ लावले आणि नंतर 'ऑपरेशन सिंदूर'वर भारताला बोचणारे वक्तव्य केले होते. यामुळे दोन्ही देशांतील संबंधांमध्ये कटुता आली आहे. जी-७ परिषदेच्या आऊटरीच सत्राला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, वादांवर कायमस्वरूपी तोडगा हा केवळ चर्चा, मुत्सद्देगिरी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यातूनच निघू शकतो, यावर भारताचा विश्वास आहे.

# दीपकेंनी घेतली आत्महत्याग्रस्त विद्यार्थिनीच्या कुटुंबाची भेट

**नागपूर (दै. संध्या)**



'नीट' ची रद्द झाल्याने नैराश्येत आत्महत्या करणाऱ्या आकांक्षा चतुर्वेदी या विद्यार्थिनीच्या घरी कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी मंगळवारी भेट दिली. त्यांनी तिच्या कुटुंबियांचे सांत्वन करीत धीर दिला. त्यानंतर त्यांनी आंदोलनादरम्यान सरकारला धारेवर धरले.

मूळची मध्य प्रदेशातील मऊगंज जिल्ह्यातील मनगिया येथील रहिवासी आकांक्षा चतुर्वेदी नागपुरात नीट परीक्षेची तयारी करीत होती. ही परीक्षा रद्द झाल्यामुळे तिने २० मे रोजी पांढरोबोडी परिसरातील अजयनगर येथील घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी मंगळवारी आंदोलनासाठी नागपुरात आले असता आकांक्षाचे वडील कृष्णकुमार चतुर्वेदींसह कुटुंबीयांची भेट घेतली. त्यामुळे त्यांना आंदोलनस्थळी पोहोचण्यात विलंब झाला. यावेळी त्यांनी आंदोलनस्थळी यायला उशिर झाल्याचे कारण स्पष्ट करताना सरकारचे वाभाडे काढले. ते म्हणाले, 'नीट'ची परिक्षा रद्द झाली, याचा मानसिक धक्का सहन न झाल्याने आकांक्षाने आत्महत्या केली. तिच्या वडीलांनाही आपल्या तरुण आणि कर्तुत्ववान मुलीच्या मृत्यूच्या दू:खातून ह्दयाघात येऊन गेला आहे. ते कॅटरिंगचे काम करत होते. आकांक्षा हीच त्यांच्या कुटूंबाचे भविष्य होती. लहान भाऊ शिक्षण घेत आहे. आता घरी कमविणारा कोणीही नाही. एक महिन्यापूर्वी आकांक्षाने आत्महत्या केली, हा बळी व्यवस्थेने घेतला आहे, सरकारने घेतला आहे, असा आरोप त्यांनी केला. नागपूर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृहनगर आहे. मात्र, इतकी मोठी घटना त्यांच्या घरापासून अवघ्या ५०० मीटरवर घडली, परंतु त्यांनी या पिडीतांच्या घरी भेट देण्याची देखील तसदी घेतली नाही, किंवा साधा फोनही केला नाही. त्यांना वाटत असेल ही 'नीट'मुळे घडलेली घटना आहे, हा केंद्र सरकारचा विषय आहे, पण आकांक्षा तर महाराष्ट्राची मुलगी होती, तुम्ही तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात, किमान 'माणुसकी' म्हणून मुख्यमंत्र्यांना पिडीतांना एक फोनही करावासा वाटला नाही?, असा प्रश्न दीपके यांनी उपस्थित केला. नीटची परिक्षा रद्द झाली नसती तर आकांक्षा डॉक्टर झाली असती, डॉक्टर होऊन तिच्याकडून समाज व देशाची सेवा घडली असती, मात्र, असे घडले नाही,अशी खंत दीपके यांनी व्यक्त केली.

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीही आकांक्षाच्या आत्महत्येवरून केंद्र सरकारवर प्रचंड टीका केली होती. राहुल गांधी यांनी आकांक्षा चतुर्वेदीच्या आत्महत्येबाबत 'एक्स'वर पोस्ट केली होती. राहुल गांधी यांनी पोस्टमध्ये "आकांक्षाचा मृत्यू ही आत्महत्या नाही तर मोदींच्या भ्रष्ट आणि ढिसाळ व्यवस्थेचा बळी आहे."

राहुल गांधीच्या आदेशानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रफुल गुडधे पाटील यांनी चतुर्वेदी परिवाराची भेट घेतली होती. यावेळी त्यांनी राहुल गांधी यांनी दिलेला संदेश ही परिवाराला सांगितला. तसेच सरकारच्या चुकांमुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होत असल्याची चर्चा यावेळी करण्यात आली. या सांत्वनपर भेटीमध्ये चतुर्वेदी परिवार आणि प्रफुल गुडधे यांच्यासोबत काँग्रेसचे काही पदाधिकारी ही उपस्थित होते.

**ढिंग-टांग**




## सुदैवाने जीवितहानी टळली, वाहतूक विस्कळीत

# मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' पुलावर भीषण अपघात

**अलिबाग (दै. संध्या)**



मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर बुधवारी सकाळी भीषण अपघात झाला. या अपघातात मिसिंग लिंकवर असलेल्या पुलावर तीन वाहने एकमेकांवर आदळली. सुदैवाने यात जिवीत हानी झाली नाही. मात्र अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

मिसिंग लिंकच्या पुलावार बुधवारी सकाळी ही दुर्घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, अपघातग्रस्त तिन्ही गाड्या मुंबईहून पुण्याच्या दिशेने निघाल्या होत्या यातील फॉर्च्युनक गाडी अचानकपणे मिसिंग लिंक वरील केबल स्ट्रे पूला जवळ तिसऱ्या मार्गिकेवर थांबली. त्यामुळे मागून येणारी हुंदाई कंपनीची वेरना कार वेगाने येऊन फॉर्च्युनर गाडीवर आदळली. या नंतर वेरना गाडीने आणखिन एका कारला जोरदार धडक दिली. अपघात इतका भिषण होता की तिनही गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र प्रवाश्यांनी सीट बेल्ट लावले असल्याने आणि गाडीतील एअर बॅग्ज उघडल्याने, जिवीत हानी झाली आहे. सर्व जण दुखापती शिवाय बचावले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा, बोरघाटचे अधिकारी व कर्मचारी तसेच संबंधित यंत्रणांचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ मदतकार्य हाती घेत अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने रस्त्याच्या बाजूला हलवली. या घटनेमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. मात्र यंत्रणांच्या तत्पर कार्यवाहीमुळे वाहतूक लवकरच सुरळीत करण्यात आली. महामार्गावर वाहन चालविताना सुरक्षित अंतर राखणे, अचानक ब्रेक न मारणे आणि वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे आवाहन महामार्ग पोलीसांकडून करण्यात आले आहे.




# संधी साधूंना भाजपमध्ये प्रवेश नाही

## रवींद्र चव्हाण यांचा ठाम इशारा; रत्नागिरीत कार्यकर्ता मेळाव्यात भूमिका स्पष्ट

**रत्नागिरी (दै. संध्या)**

"संधी साधून महाविकास आघाडीमध्ये गेलेल्यांना मी प्रदेशाध्यक्ष असताना पुन्हा भाजपमध्ये प्रवेश दिला जाणार नाही," असा स्पष्ट इशारा भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी रत्नागिरीत दिला. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात आयोजित भाजप पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. भाजपची सत्ता केंद्रापासून राज्यापर्यंत पोहोचण्यामागे तळागाळातील निष्ठावंत कार्यकर्त्यांचे योगदान असल्याचे सांगत, "प्रत्येक गावात किमान पाच कट्टर विचारांचे भाजप कार्यकर्ते उभे करा," असे आवाहन त्यांनी केले. कोकणातील बेरोजगारीचा प्रश्न गंभीर असल्याचे नमूद करत चव्हाण म्हणाले की, तरुण रोजगारासाठी मुंबईकडे स्थलांतर करतात आणि त्यामुळे गावे ओस पडत आहेत. या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी धार्मिक पर्यटन हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. मार्लेश्वर, गणपतीपुळे, संगमेश्वर सूर्य मंदिर, कसबा येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारक, तसेच राजापूर येथील श्री धुतपापेश्वर मंदिर यांसारख्या स्थळांचा विकास करून रोजगारनिर्मिती साधता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यासाठी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी पर्यटन विकास आराखडे तयार करून पक्षाकडे पाठवावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.


यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सहदेव बेटकर यांनी यावेळी भाजपमध्ये प्रवेश केला. तसेच चिपळूण, खेड, मंडणगड, राजापूर व रत्नागिरी परिसरातील सुमारे पाचशेहून अधिक माजी लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या कार्यक्रमाला आमदार प्रमोद जठार, आमदार निरंजन डावखरे, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार विनय नातू, राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, वैभव खेडेकर, अॅड. दीपक पटवर्धन, माजी आमदार सूर्यकांत दळवी, तसेच उपनगराध्यक्ष समीर तिवरेकर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचे तरुण राहण्यासाठी अचाट प्रयोग!

रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन सध्या ७३ वर्षांचे आहेत. अत्यंत कठोर, हेकेखोर आणि स्वतःला ताकदवान तसंच तंदुरुस्त नेता म्हणून ते जगासमोर कायमच पेश करत आले आहेत. घोडेस्वारी, आइस हॉकी, शिकार आणि मोटारसायकल चालवतानाही ते अनेकदा दिसले आहेत. जास्तीत जास्त वर्षं जगतानाच स्वतःला फिट ठेवण्यासाठी अनेक प्रकारचे अचाट प्रयोग ते कायमच करत असतात. त्यासाठी क्रायो थेरपी, जीन थेरपी, पेप्टाइड थेरपी, थ्रीडी बायोप्रिंटिंगसारखे उपाय ते नेहमी करत असतात. क्रायो थेरपी या पद्धतीत तर अँटि एजिंगसाठी शरीराला अतिथंड म्हणजे उणे शंभर ते उणे १४० अंश सेल्सिअस तापमानात ठेवलं जातं. पुतीनही स्वतःवर हा प्रयोग करताना उणे ११२ अंश सेल्सिअस इतक्या प्रचंड गार पाण्यात उभे राहतात. या पद्धतीला कोल्ड थेरपी असंही म्हटलं जातं.

पुतीन यांनी वय थोपवण्याची ही प्रक्रिया आता केवळ स्वतःपुरतीच न ठेवता त्यासाठी संपूर्ण देशालाच सामावून घेतलं आहे. त्यासाठी रशिया वृद्धत्व रोखण्याचं तंत्रज्ञान विकसित करत आहे. वाढतं वय आणि शरीराची कमजोरी रोखण्यासाठी २६ अब्ज डॉलर म्हणजेच सुमारे २.४७ लाख कोटी रुपयांचा मोठा सरकारी प्रकल्प रशियानं सुरू केला आहे. पुतीन यांचे अनेक निकटवर्तीय सहकारीही आता ७० वर्षांहून अधिक वयाचे झाले आहेत. त्यामुळे ही अँटि एजिंग मोहीम केवळ वैज्ञानिक प्रयोग नसून रशियाच्या सर्वोच्च सत्ताधारी नेतृत्वाच्या वैयक्तिक चिंतांशीही संबंधित असल्याचं मानलं जात आहे. रशियात पुरुषांचं सरासरी आयुर्मान केवळ ६८ वर्षं आहे. अमेरिकेत ते ७६ वर्षं आणि युरोपात ८० वर्षं आहे.



रशियन सरकारचा दावा आहे की या मोहिमेचा उद्देश वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावणं आणि दशकाच्या अखेरीस सुमारे १.७५ लाख लोकांचे प्राण वाचवणं हा आहे. रशियाचे उपविज्ञानमंत्री डेनिस सेकिरिन्स्की यांनी सांगितलं की, वैज्ञानिक अशी जीन थेरपी विकसित करत आहेत, जी शरीरातील पेशींच्या वृद्धत्वाची प्रक्रिया मंद करू शकते. त्यांनी याला अँटि एजिंग क्षेत्रातील सर्वात महत्त्वाच्या संशोधनांपैकी एक म्हटलं होतं.

अहवालांनुसार, पुतीन बराच काळ क्रायो थेरपी आणि पेप्टाइड थेरपी घेत आहेत. रशियन वैज्ञानिक व्लादिमीर खाविन्सन हे पुतीन यांना वासरांच्या ऊतकांपासून तयार केलेले विशेष पेप्टाइड्स देत असत. त्यांचा दावा होता की माणूस १२० वर्षांपर्यंत जगू शकतो. स्वतःला तरुण ठेवण्यासाठी पुतीन क्रायो थेरपीचाही वापर करतात. यात शरीराला सुमारे उणे ११२ अंश सेल्सियस तापमानात काही काळ ठेवलं जातं. ऑस्ट्रियाचे माजी चान्सलर सेबास्टियन कुर्झ यांनी सांगितलं होतं की, २०१८ मध्ये क्रेमलिनमधील एका बैठकीदरम्यान पुतीन यांनी त्यांना या थेरपीचे फायदे सविस्तर समजावून सांगितले होते. मागील वर्षी बीजिंगमध्ये झालेल्या एका लष्करी संचलनादरम्यान पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील संभाषणाची मोठी चर्चा झाली होती. ते मानवी अवयव बदलून आयुष्य वाढवण्याबाबत आणि माणूस १५० वर्षांपर्यंत जगू शकण्याच्या शक्यतेबाबत बोलताना ऐकू आले होते. त्यावेळी याकडे दोन वयोवृद्ध नेत्यांमधील सामान्य संवाद म्हणून पाहिलं गेलं होतं. मात्र, आता त्याचा संबंध रशियाच्या दीर्घायुष्यविषयक सरकारी योजनेशी जोडला जात आहे.

## संस्कृत सुभाषित

व्रजान्तिते मूढधिय : पराभवं भवान्ति मायाविषु ये न मायिनः। प्रविश्य हि घ्नान्ति शठास्तथाविधान् असंवृताङ् गान् निशिता श्वेषतः।।

अर्थ – जे मूर्ख लोक कपटी लोकांशी कपटीपणाने वागत नाहीत, त्यांचा पराभव होतो. उघड्या अंगात विषारी बाण शिरावेत त्याप्रमाणे हे कपटी लोक सज्जनांच्या अंतरंगात प्रवेशून त्यांचा नाश करतात.

## गुरु वचन

### मानवास हावरटपणा मारक

प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतांचे निरीक्षण केले पाहिजे व हावरटपणाविषयी नेहमी सावध राहिले पाहिजे. जे हावरट असतात ते आपली भूक, झोप इत्यादी सर्व गमावून बसतात. इच्छा नियमित केल्यामुळे आरोग्य सुदृढ राखण्यात मदत होते व जीवन नैसर्गिक नियमांनुसार चालते. हे नियम किंवा शिस्त म्हणजे इच्छा दाबणे नसून आपल्या क्षमतेनुसार समतोल रोखणे आहे. जास्त खाणे, झोपणे, जागरण आरोग्यासाठी हानिकारक आहे. असे केल्यामुळे शरीरातील विविध यंत्रणा बिघडतात व जीवनाचा उद्देश्यच नष्ट होतो. यामुळे मेंदू क्षीण होतो, हीनभावना निर्माण होते व आत्मविश्वास नष्ट होतो. क्रोध दूसरा नकारात्मक संवेग आहे जो चार मुळ प्रवृत्तीतून निर्माण होतो. जेव्हा एखाद्याची इच्छा पुर्ण होत नाही तेव्हा त्याचे उद्विग्न होते व त्यातून संताप निर्माण होतो म्हणून व्यक्तीने संताप कसा नियंत्रित करावा? हे जाणले पाहिजे.

सर्वप्रथम व्यक्तीने हे लक्षात घेतले पाहिजे की, कुठली इच्छा त्याच्या विकासात सहायक आहे किंवा मारक आहे. जर बुद्धीला शिस्त लावली तर या कामात मदत मिळेल. जर एखाद्या व्यक्तीने ही योग्यता आपल्यात विकसित केली तर राग आल्यानंतर तो स्वत: विषण करेल की, तो का चिडला व त्याची कुठली इच्छा पुर्ण झाली नाही. असे करुन त्यास आपल्या रागाचे कारण समजू शकेल.

## उपदेशकथा

### सावधगिरी

एक वृद्ध तपस्वी रानात खोपट बांधून चिंतन-मननात काळ व्यतित करत असत. पुढे तरुणपणीच विरक्ती आलेला एक चेला त्याला लाभला. कंदमुळे नि फळे खावी, झऱ्याचे पाणी प्यावे, वृक्षवल्लींना सोयरी मानून मग्न असावे, असा त्याचा दिनक्रम होता. एकदा गुरूवर्यांनी शिष्याला आज्ञा केली की, समोरच्या झाडावर चढ. शाल्मली वृक्ष होता. सरळसोट साग-शिष्याला वृक्षारोहणाचा सराव नव्हता. तो धीराने, धीमेपणाने चढू लागला. पावलागणिक गुरूस्मरण करत गेला. उंच शेंड्यापर्यंत पोहचला. उगवत्या सूर्यनारायणाचे दर्शन घेतले नि उतरू लागला. वृद्धाचार्य मौन धारण करून होते. सावकाशपणे पर्णराजीत लपलेल्या फांद्या पकडत शिष्य पर्णहीन खोडावर पाय ठेवणार एवढ्यात गुरुजींचा मौनभंग झाला. 'सांभाळ रे बाळा!' युवकाला विस्मय वाटला. एवढ्या उंचावर चढलो नि खबरदारीने उतरलो तेव्हा चकार शब्द नाही काढला नि आता भुईपाशी ठेपलो तेव्हा सांभाळून उतर म्हणतायत! हा काय अजब प्रकार! शिष्याच्या चेहऱ्यावरील गोंधळ गुरुजींच्या तेव्हाच ध्यानी आला. ते म्हणाले, 'बेटा, धोका समोर दिसत असतो तेव्हा प्रत्येक सुबुद्ध माणूस सावध असतो. त्याला इशारत लागत नाही. जेव्हा माणूस स्वत:ला सुरक्षित मानू लागतो, धोका संपला आता, असे समजू लागतो तेव्हा खरे तर धोका सुरू होतो. माझे केस पिकले, गात्रे थकली पण आजवर कुणालाही झाडाच्या शेंड्यावरून कोसळलेले पाहिलेले नाही. सारे घसरले खुशालजी, ते जमीन जवळ आली तेव्हा! जेव्हा ते गाफील झाले, सैल सुटले, निर्धास्त बनले तेव्हाच त्यांचे पाय घसरले. हे काही न सुटणारे कोडे नाही, तर कोड्यात टाकणारे जीवन आहे!'

कथा उपदेश : अखंड सावधानता असावी हेच खरे.

## पंचांग

| पंचांग | नक्षत्र:पुष्य ११:३२:१० |
|---|---|
| १८ जून २०२६ | योग:व्याघात १७:३४:५२ |
| गुरुवार | करण:वणिज ०८:१४:१२ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि १८:५८:५९ |
| निज ज्येष्ठ शके | करण:बव २९:५४:०३+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:मिथुन |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:कर्क |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४८ |
| मास– निज ज्येष्ठ | मुस्लिम मास – मोहरम |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – २ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:चतुर्थी १८:५८:५९ | विनायक चतुर्थी |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 5 | 7 | 6 | 2 | | 8 |
| 8 | | | 9 | | 3 | | | |
| | 6 | | 8 | | | 4 | | |
| 5 | 4 | 7 | | | 1 | | 2 | |
| | 9 | | | | | | 6 | |
| | 3 | | 4 | | | 5 | 7 | 9 |
| | | 6 | | | 9 | | 5 | |
| | | | 2 | | 5 | | | 7 |
| 3 | | 5 | 7 | 6 | 4 | | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९८३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1 | 3 | 9 | 5 | 4 | 7 | 8 | 2 |
| 7 | 4 | 2 | 1 | 8 | 6 | 5 | 9 | 3 |
| 5 | 9 | 8 | 7 | 2 | 3 | 1 | 6 | 4 |
| 2 | 6 | 7 | 3 | 1 | 8 | 9 | 4 | 5 |
| 8 | 5 | 4 | 2 | 7 | 9 | 6 | 3 | 1 |
| 1 | 3 | 9 | 6 | 4 | 5 | 2 | 7 | 8 |
| 9 | 2 | 5 | 8 | 3 | 7 | 4 | 1 | 6 |
| 4 | 8 | 6 | 5 | 9 | 1 | 3 | 2 | 7 |
| 3 | 7 | 1 | 4 | 6 | 2 | 8 | 5 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५४१ – आयरिश सदनाने हेन्री आठवा याला आयर्लंडचा राजेपदी निवडले.
- १९५३ – मिस्त्रला गणराज्य घोषित करण्यात आले, जनरल निखीब राष्ट्रपती बनले.
- १९६० – रिअल मॅड्रीड फुटबॉल क्लबने ५वा यूरोप चषक जिंकला.
- १९७५ – ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज गेरी गीलमरने विश्वचषकातील उपांत्य सामन्यात इंग्लंडचे विरुद्ध खेळताना १४ धावा देत ६ बळी घेतले.

### राष्ट्रीय

- २००७ – भारतीय वंशाच्या पण अमेरिकन नागरिक असलेल्या एओलीयन इंक कंपनीचे मुख्य अधिकारी बाला कृष्णमुर्ती यांना उद्योगक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल अमेरिकेने एंजिलबर्गर रोबोटिक्स हा पुरस्कार प्रदान करून सन्मानीत केले.

### जन्म

- १७९० – अमेरिकी राजनेता जॉन इटन याचा जन्म.
- १९६४ – सद्दाम हुसैन यांचा मोठा मुलगा उदेय हुसैन याचा जन्म.
- १९७१ – न्यूझीलंडचा सलामी फलंदाज ब्लेअर पोकोक याचा जन्म.

### निधन

- १९०१ – रामचंद्र भिकाजी गुंजीकर, विविध ज्ञानविस्तार या मासिकाचे संपादक यांचे निधन.
- १९७१ – पॉल कारर, स्विस रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता यांचे निधन.
- १९९९ – श्रीपाद रामकृष्ण काळे, मराठी साहित्यिक यांचे निधन.
- २००३ – जानकीदास, भारतीय चरित्र अभिनेता यांचे निधन.

## : SMS :

A mouse was going with its kids.
A cat jumped in front of them.
Mouse shouted: "BHOW BHOW"
Cat ran away..
Mouse: That's the advantage of learning foreign language.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.१ | २४.९ |
| अहमदनगर | ३७.२ | २३.८ |
| अकोला | ४२.७ | ३०.४ |
| अमरावती | ४१.५ | २९.७ |
| बीड | ४४.४ | ३२ |
| भंडारा | ४४.१ | २९.१ |
| बुलढाणा | ४१.५ | २७ |
| चंद्रपूर | ४४.४ | ३२.२ |
| चेन्नई | ४४.७ | ३४.२ |
| नवी दिल्ली | ४१.६ | ३१.४ |
| धुळे | ४०.४ | २९.४ |
| गोंदिया | ४२.९ | २९.५ |
| जळगाव | ४३ | २९.३ |
| कोल्हापूर | ३५.५ | २३.५ |
| लातूर | ३८ | २४.६ |
| मुंबई | ३९.४ | ३५.५ |
| नागपूर | ४३ | ३१.१ |
| नांदेड | ४०.७ | २७ |
| नंदूरबार | ३७.२ | २६.४ |
| नाशिक | ३६.१ | २५.४ |
| पुणे | ३४.६ | २३.४ |
| पंढरपूर | ३८.९ | २५.७ |
| सातारा | ३६.४ | २२.१ |
| सांगली | ३७.७ | २३.६ |
| सोलापूर | ३८.७ | २६.३ |
| वर्धा | ४३.१ | ३२.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** नवीन कामाचा आरंभ करण्यास आजचा व्यावसायिक प्रदर्शने भरविता येतील. थोरामोठयांचे चांगले सहकार्य लाभेल.

**तुळ :** आपल्या वाक्चातुर्याने दुसऱ्यांची मने जिंकून ध्येयपूर्ती कराल. अनावश्यक खर्चाचे प्रमाण वाढेल.

**वृषभ :** पुढे घडणाऱ्या घटनांची आपल्याला चाहूल लागेल. महिलांनी जपजाप्याकडे जास्त लक्ष द्यावे. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे.

**वृश्चिक :** सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल. विवाहेच्छूक तरुणांना मनपसंत जोडीदार मिळेल. जनसंपर्कातून चांगला फायदा होईल.

**मिथुन :** स्वकष्टाचा पैसा मिळेल. तसाच खर्चही वाढेल. दूरच्या प्रवासाचे योग येतील. आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील.

**धनु :** जुने मित्र भेटल्याने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. पत्नीचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. एकमताने निर्णय घ्याल.

**कर्क :** एखादी गोष्ट आपण निश्चित करु शकू हा विश्वास वाटेल.आपल्या वाक्चातुर्याच्या जोरावर मोठी मजल माराल. नोकरीत पदोन्नती होईल.

**मकर :** व्यावसायिक वादंग टाळावेत. आपण हाती घेतलेले प्रत्येक काम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहाय्यकांची मदत मोलाची ठरणार आहे.


**सिंह :** एखाद्या संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकाराल. व्यवसायत उद्योगातून चांगली प्राप्ती होईल. इच्छा, आकांक्षा कृतीत आल्यामुळे समाधान लाभेल.

**कुंभ :** व्यवसायीक उद्योगातील कामानिमित्त कर्ज प्रकरण रखडले असेल तर ते मार्गी लागेल. प्रिय व्यक्तींच्या भेटी होतील. अंध:श्रद्धेला बळी पडू नका.

**कन्या :** कामाची आखणी नियोजनबद्ध केल्यामुळे व्यावसायिक उत्कर्ष साधता येईल. प्रतिष्ठित व्यक्तींचे सहकार्य लाभेल.

**मीन :** अचनाक अनावश्यक खर्च उद्भवतील. मानसिक ताणतणाव जाणविण्याची शक्यता राहते. पूर्वनियोजित प्रवासात विलंब होण्याची शक्यता आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८४



**आडवे शब्द**

१. रोजच्या कार्यक्रमाची वही, डायरी
४. बहुमोल, किंमती
६. लकवा
१०. आशीर्वाद, पाठिंबा
११. कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ, पारंब्यांचे झाड
१२. पडसे
१३. राजवाडा
१४. मुंज
१६. नशिबात लिहिलेले सुखदु:खाचे अनुभव
१७. लहान मुलगी
१९. शेवट
२०. टक्कर
२२. छोटे वादळ
२४. पशू
२५. हाकेला प्रतिसाद
२६. हिंम्मत, धैर्य
२९. गर्व, मस्ती
३१. अवघड, कष्टप्रद
३२. सूचना, चिथावणी
३४. गोमाता
३६. मल्ल
३७. बारीक झणझण
३८. मृत्यूदेवता
३९. वडील
४०. विठ्ठलाची पत्नी
४२. समशेर
४४. फायदा
४८. हजार किलो
५०. पहारेकरी
५४. मृत्यू, वेळ
५५. बहुतेक, आजूबाजूला
५८. मनाचा ओढा
५९. राखल्यास वाढणारी
६०. आकाश
६१. वाडा
६२. मृत्यू (हिंदी)
६३. अभिप्राय
६४. एक प्रश्नार्थक शब्द
६६. दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
६९. दु:ख
७०. समुद्रकिनारे आणि काजूच्या फेणीसाठी प्रसिद्ध राज्य
७१. श्रीमंत माणूस
७२. सांगणे
७५. पाकळ्यांचा पांढरा कंद
७६. वर्ष, साल
७७. गजवदन, गणपति
८०. सत्व
८१. बासरी
८२. एक मिश्र धातू
८३. मृत्यू पावणे
८४. शेणाचा गोळा
८५. कथाकहाण्यांमधील ऐसपैस गाव

**उभे शब्द**

१. राक्षस
२. भरदिवसा
३. ढग
४. गप्प बसण्याचा वसा
५. करगोटा
६. शर्त
७. गाजावाजा
८. रस्ता, मार्ग
९. लोकांची दाटी
१२. वाकळा नसलेला
१५. धकधक
१७. वितभर असले तरी तालावर नाचवणारे
१८. अद्याप
२१. न्यूनता, उणीव
२३. खाली पडू न देता, नेहमी
२७. सुताराकडचे दातेरी हत्यार
२८. जल
२९. महिना
३०. जहाज, नौका
३१. खोदकाम
३३. चालू काळ
३५. जुळे
३६. वेतन
४१. दुष्ट
४३. सोसाट्याचा वारा
४५. घटस्फोट
४६. मावा
४७. नदीला आलेले अतोनात भरते
४९. विशेष
५१. दुष्ट
५२. निकट
५३. भुईकोट किल्ला
५५. इजा
५६. कापड, वस्त्र
५७. पदर
६०. कमाई, उत्पन्न
६३. हेतू, कारण
६४. लबाडीचा बेत
६५. पापडात वापरला जाणारा क्षार
६७. कापणे
६८. पत्र
७०. पोते
७१. पैसेवाला
७३. दमणे
७४. रक्तवाहिनी
७६. समतल
७७. हत्ती
७८. खूप
७९. जुनाच्या विरुद्ध

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ९८३ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.दिवसाउजेडी ५.आसन्नमरण ९.मोका १०.रंग ११.नट्टपट्टा १२.लक १३.मुकाट १५.पाडस १७.साईबाबा १९.टक २०.ईश्वर २२.नरवर २४.गज २५.भागाकार २७.गोलाकार २९.परत परत ३२.रसातल ३४.लस ३७.यम ३८.बेकार ४०.शुक्रवार ४१.खेळकर ४३.नसरुड ४५.रटरट ४७.राबता ४८.कारखाना ५०.मऊ ५२.चरचरीत ५४.गाजर ५६.दवाखाना ५८.नजर ५९.अंदाज ६०.अंबर ६१.कापडचोपड ६३.तनमन ६४.फर ६५.पोर ६८.पाट ६९.करमेना ७०.अदाकार ७१.सटरफटर ७३.वासर ७४.वाटी ७५.डावेउजवे करणे ७६.भास

उभे उत्तर : १.दिरंगाई २.वग ३.उजेड ४.डीन ५.आपपरभाव ६.सट्टा ७.मलई ८.रकबा ९.मोकाट ९अ.काटकसर १४.पाया १५.पार १६.सनगर १७.सावकार १८.बाह्यगोल २१.श्वशुर २३.रजत २६.रसायन २८.कालिका २९.परशुराम ३०.तलवार ३१.पसरट ३३.तमस ३५.आळ ३६.सरबत ३८.बेडर ३९.रसना ४१.खेटर ४२.करारी ४४.रुकार ४६.रचनाकार ४९.खानदान ५१.ऊदबत्ती ५३.चहाडखोर ५४.गाज ५५.जरतर ५७.वार ५८.नड ५९.अंमलदार ६२.पवना ६४.फटफटी ६५.पोथी ६६.मोरपीस ६७.कसब ६८.पारवा ६९.करडा ७०.असणे ७२.नवे ७३.वार

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मोका गुन्ह्यात चार वर्षापासून फरार असलेला आरोपी जेरबंद

पुणे (दैनिक संध्या) : बारामती तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर 563/2022 भा.द वि कलम 307, 120(ब), 201, 143 सह आर्म ऍक्ट कलम 2,25 मधील आरोपी नामे सोनू उर्फ ओंकार संजय जाधव राहणार-कळंब,तालुका-इंदापूर जिल्हा-पुणे हा गुन्हा केल्यापासून फरार होता.आज रोजी फरार आरोपी सोनू उर्फ ओंकार संजय जाधव हा पोलीस ठाणे हद्दीत एम आय डी सी परिसरात येणार असल्याची गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती.सदर बातमीचे अनुषंगाने आम्ही पोलीस स्टाफ सह एम आय डी सी परिसरात पेट्रोलिंग करत असताना सोनू उर्फ ओंकार संजय जाधव राहणार-कळंब तालुका-इंदापूर जिल्हा-पुणे हा मिळून आल्याने त्यास अटक केली आहे.सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण श्री.संदीप गिल्ल,मा.अपर पोलीस अधीक्षक बारामती,श्री.गणेश बिरादार, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती,श्री. सुदर्शन राठोड,पोलीस निरीक्षक,बारामती तालुका पोलीस ठाणे श्री.नारायण पवार यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली ग्रेड पो उप नी श्री.कल्याण शिंगाडे,सफौ सुरेंद्र वाघ, पोहवा खारतोडे,पोहवा एकसिंगे,पो हवा आप्पा दराडे, पोशि निलेश वाकळे,पो शि मनोज पवार यांनी सदरची कामगिरी केली आहे.



### न्यू इंग्लिश स्कूल मध्ये " आपला गाव आरोग्य संपन्न गाव " शिबिर उत्साहात

■ लोणी भापकर येथे आरोग्य, स्वच्छता आणि निरोगी जीवनशैलीचे धडे

पुणे (दैनिक संध्या) : " आपला गाव,आरोग्यसंपन्नगाव"याउपक्रमांतर्गत न्यू इंग्लिश स्कूल,लोणी भापकर येथे आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता,सकस आहार,संसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध,योग व व्यायामाचे महत्त्व तसेच निरोगी जीवनशैली याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.जीवन सरतापे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यदायी सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले.शाळेचे मुख्याध्यापक जगताप यांनी शालेय स्तरावर आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याची गरज अधोरेखित केली.या कार्यक्रमास अविनाश चौधर (आरोग्य निरीक्षक),अरुणा मस्कुले (आरोग्य सहायिका),राजकुमार भापकर (आरोग्य सेवक),संगीता मदने (आरोग्य सेविका),राणी धायगुडे (गट प्रवर्तक),अंजली जाधव, सुवर्णा धायगुडे,उषा पाटोळे, प्रमिला गोलांडे (आशा सेविका) तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.शिबिराद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासह स्वच्छ,निरोगी आणि आरोग्यसंपन्न गाव घडविण्याचा संदेश देण्यात आला.

### खरीप पिकांसाठी रुंद सरी-वरंबा(BBF) पद्धतीने पेरणी करण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे अनिश्चित स्वरूप लक्षात घेता शेतकऱ्यांनी पिकांच्या चांगल्या उगवणीसाठी, पाण्याचा कार्यक्षम वापर व उत्पादनवाढीसाठी रुंद सरी-वरंबा (BBF) पद्धतीने पेरणी करावी, असे आवाहन कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. रुंद सरी-वरंबा पद्धतीमध्ये साधारणपणे ९० ते १२० सेमी रुंदीचा वरंबा व १५ ते २० सें. मी. ची सरी तयार करून पेरणी केली जाते. या पद्धतीमुळे अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा जलद गतीने होतो. तसेच पावसात खंड पडल्यास सरींमध्ये साठलेल्या ओलाव्याचा पिकांना फायदा होतो. परिणामी मुळांची वाढ चांगली होऊन खतांचा कार्यक्षम वापर होतो व उत्पादनात वाढ होते. सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, कापूस तसेच इतर खरीप पिकांसाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त मानली जाते. जमिनीतील ओलावा संवर्धन, मृदा धूप नियंत्रण आणि पाणी व्यवस्थापनासाठीही ती प्रभावी ठरते. याशिवाय आंतरमशागत, खत व्यवस्थापन व तण नियंत्रणाची कामे सुलभ होतात. मात्र अतिशय कोरड्या जमिनीत या पद्धतीने पेरणी टाळावी, असा सल्लाही देण्यात आला आहे. बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली रुंद सरी-वरंबा यंत्राचा वापर करून पेरणी करावी. हे यंत्र अनुदानित दरात उपलब्ध असून त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करता येतो. अधिक माहितीसाठी संबंधित मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




### दीपा मुधोळ मुंडे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यात नशामुक्त भारत अभियानाचा शुभारंभ

पुणे (दैनिक संध्या) : समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ मुंडे आणि प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नशामुक्त भारत अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नशामुक्त अभियानाची शपथ घेण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणामाबाबत माहिती देण्यात आली. सदर उद्घाटन सफाई कामगार मुलींची शाळा येरवडा या ठिकाणी करण्यात आले. यावेळी होप फाउंडेशनचे डॉ.मोरे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉ. राधाकिसन देवढे, सहाय्यक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद सागर सोनवणे आदी उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागाअंतर्गत समाज कल्याण विभागाच्यावतीने आयोजित नशामुक्ती पोस्टर स्पर्धा पूना स्कूल अँड होम फॉर द ब्लाइंड बॉईज, कोरेगाव पार्क पुणे येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्यातील दहा दिव्यांग शाळेतील सुमारे ९० विद्यार्थी आणि कला शिक्षक उपस्थित होते. प्रख्यात चित्रकार श्री. सबनीस यांनी पोस्टर स्पर्धेचे परीक्षण करुन गुणांकन केले.

# विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम प्रक्रिया शनिवारपासून सुरु

पुणे (दै. संध्या)



जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांची बैठक संपन्न

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून शनिवार दिनांक २० जून पासून विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ही यशस्विरित्या राबविण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी प्राधान्याने मतदार केंद्र प्रतिनिधी यांची नेमणूक करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी यांनी केले. यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर तसेच जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पाटी (शरदचंद्र पवार गट), भारतीय जनता पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना अशा विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, जिल्हा प्रमुख तसेच प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.डुडी म्हणाले, राज्यात पुणे जिल्ह्यात सर्वाधिक मतदार संख्या आहे. जिल्ह्यात एकूण ८ हजार ४१७ मतदान केंद्र असून आजअखेर ९० लाख ८४ हजार ०८८ इतकी मतदार संख्या आहे. पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये व अपात्र मतदार यादीत समाविष्ट होऊ नये या उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत २० ते २९ जून या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण व गणना अर्ज प्रिंटींग, ३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदार गणना अर्ज घरोघरी जाऊन वितरण, ५ ऑगस्ट रोजी तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध करणे, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दावे आणि हरकती दाखल करणे, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर- दाखल हरकतींवर सुनावणी व ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले, विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी सहायक निवडणूक अधिकाऱ्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे राबविण्यात येणार असून दावे व हरकतींवर मंडल निहाय सुनावण्या घेण्यात येणार आहेत. सुनावणीची तारीख १० दिवस आधी जाहीर केली जाईल. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी क्षेत्रीय स्तरावर काम करण्याची गरज आहे. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी वितरीत केलेले गणना अर्ज राजकीय पक्षांनी नियुक्त केलेले अधिकृत मतदार केंद्र प्रतिनिधी मतदारांकडून घेऊन दिवसाला ५० अर्ज जमा करुन देऊ शकतात. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये समन्वय आवश्यक आहे. मतदार याद्यांमधील जास्तीत जास्त त्रुटी, चुका दुरुस्त करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरु असेपर्यंत दर बुधवारी दुपारी १.३० वाजता राजकीय पक्षांची बैठक घेण्यात येणार आहे.

त्याबैठकीस सर्व राजकीय पक्षांनी उपस्थित राहून क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सादर कराव्यात, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले. श्रीमती कळसकर यांनी सादरीकरणाद्वारे संपूर्ण विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना दिली. तसेच समाजातील विशेष घटकही या प्रक्रियेतून वगळला जाऊ नये यासाठी समाज कल्याण विभागाच्या मदतीने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

सन २०२६ च्या मतदार यादीत नाव समाविष्ट असलेले तृतीयपंथी मतदार यादीतील पत्त्यावर राहत नसल्यास त्यांचा पत्ता या मोहिमे अंतर्गत शोधण्यात येऊन त्यांना गणना फॉर्म देण्यात येणार आहे. ८५ वर्षाच्या पुढील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारही या गणनेपासून वंचित राहणार नाहीत.

तसेच भोर, जुन्नर, मुळशी या आदिवासी भागातील कामानिमित्त बाहेरगावी असणाऱ्या मतदारांनाही गणना फॉर्म देण्यासाठी टीम तयार करण्यात आल्या असल्याचे श्रीमती कळसकर यांनी सांगितले. यावेळी राजकीय पक्षांनी उपस्थित केलेल्या शंकांचे जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी निरसन केले.

## जीम व्यावसायिकाला मारण्यासाठी २० लाखांची दिली होती सुपारी

पुणे (दै. संध्या)

सहकारनगर परिसरात जीम व्यावसायिकावर गोळीबार केल्याप्रकरणात मुख्य सूत्रधार योगेश माकस याच्या सांगण्यावरून अटक आरोपी परेश नागेश विसापुरे याने गोळीबार केला. या कामाबद्दल माकस हा विसापुरे याला २० लाख रुपये देणार होता, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी (ता. १७) न्यायालयास दिली.

ठरलेल्या रकमेपैकी काही रक्कम विसापुरे याला मिळाली आहे, असे तपासात निष्पन्न झाले आहे. याबाबत जीम व्यावसायिक योगेश बानेकर (वय ३३) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणात अटक केलेल्या आदित्य विष्णू थोपटे, परेश नागेश विसापुरे व योगेश राजू माकस यांला पोलिस कोठडीची मुदत संपल्याने बुधवारी (दि. १७) न्यायालयात हजर करण्यात आले होते. हे २० लाख रुपये नक्की कोण देणार होते किंवा कसे देणार होते याबाबत तपास करायचा आहे. त्यामुळे पुढील तपासासाठी आरोपींच्या पोलिस कोठडीत पाच दिवसांची वाढ करण्यात यावी, असा युक्तिवाद सरकारी वकील भाग्यश्री डागळे-संचेती यांनी केली. सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपींच्या पोलिस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली.

## देशी-विदेशी फळझाडांच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल

पुणे (दै. संध्या)



मोठ्या प्रमाणात विविध दुर्मिळ रोपांची बुकिंग

आधुनिक व उच्च मूल्याच्या फळबागांकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असून विदेशी व दुर्मिळ फळझाडांच्या लागवडीसाठी शेतकरी पुढाकार घेत आहेत.याच अनुषंगाने सासवड येथील संजय कोरडे व महेश कोरडे (सिंगापूर-सासवड) यांच्या रोपवाटिकेतून जपानचा मियाझाकी आंबा, ॲवाकॅडो,बॉल सुंदरी बोर, स्टार आवळा,तमालपत्र,दालचीनी, ऑलस्पाईस,मलेशियन ग्रीन डार्फ नारळ,केशर आंबा,गुजरात लंगडा आंबा,ब्लू जावा केळी,लाल वेलची केळी,अण्णा सफरचंद,लिची,जाम फ्रूट,चेरी,मिरॅकल बेरी,डायमंड पेरू, रेड चिंच व थाई चिंच यांसह विविध देशी विदेशी फळझाडांच्या रोपांची मोठ्या प्रमाणात बुकिंग करण्यात आली.

ही रोपे घराजवळ,दुकानांच्या परिसरात तसेच शेताच्या बांधावर लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.भविष्यात शेतकऱ्यांना पारंपरिक पिकांसोबतच फळबागांमधून अतिरिक्त उत्पन्न मिळावावे लागणार आहे, त्याचबरोबर बांधावर लागवड केल्यामुळे नैसर्गिक एकत्रीत किडरोग नियंत्रण होणार असून जैवविविधता पण वाढण्यास हातभार लागणार आहे,त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनास चालना मिळणार आहे.

याप्रसंगी कृषिभूषण प्रल्हाद वरे, कल्याण काटे,मंगेश तावरे,तुकाराम गावडे व महेश कोरडे आदी उपस्थित होते.

दरम्यान,वृक्षलागवडीसाठी जून,जुलै व ऑगस्ट हा कालावधी सर्वाधिक अनुकूल मानला जातो. मात्र स्थानिक हवामान,जमिनीचा प्रकार आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसारच रोपांची निवड व लागवड करावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.योग्य नियोजन आणि निगा राखल्यास विदेशी फळझाडे भविष्यात शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा नवा स्रोत ठरू शकतात.

## पशुपालकांनी चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे

पुणे (दै. संध्या)

आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील

जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या 'एल निनो'च्या संभाव्य संकटामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. पशुपालकांना या संकटाचा सामना समर्थपणे करता यावा, यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुपालक व शेतकरी यांना पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गाई व म्हशींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात घट होऊ नये म्हणून पशुपालकांनी पोषक असणाऱ्या चारा पिकांची लागवड करावी. अशी पिके निवडावीत ज्यातून मुख्य शेतमाल (धान्य/उत्पादन) तर मिळेलच, सोबतीला जनावरांच्या पोषणासाठी दर्जेदार चाराही उपलब्ध होईल. शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर अथवा पडीक जमिनीवर येणारे नैसर्गिक गवत वाया न घालवता त्याचे योग्य जतन करावे. पावसाची ओढ किंवा टंचाईच्या संकट काळात हेच गवत जनावरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आधार ठरणार आहे. भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या उपलब्ध जमिनीवर मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादनावर भर द्यावा. उत्पादित केलेला अतिरिक्त चारा 'मुरघास' किंवा सुक्या चाऱ्याच्या स्वरूपात साठवून ठेवावा, जेणेकरून जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. पशुसंवर्धन विभागामार्फत 'एल निनो'च्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी पशुपालक शेतकरी बांधवांना विविध माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. या संभाव्य संकटकाळात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सक्षम असून, कोणत्याही शंका तसेच अडचणी संदर्भात पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर नंबरवरुन माहिती व पशुवैद्यकीय सेवा प्राप्त करुन घ्यावात, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे. डॉ. किरण पाटील, आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य: एल निनोच्या सावटामुळे उद्भवणाऱ्या संभाव्य टंचाईचा फटका आपल्या पशुधनाला बसू नये, ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. योग्य नियोजन, पोषक चारा पिकांची निवड आणि उपलब्ध चाऱ्याची साठवणूक करून आपण पशुधनाचे पोषण आणि आपले आर्थिक उत्पन्न दोन्ही सुरक्षित ठेवू शकतो. सर्व पशुपालकांनी या आवाहनाचा गांभीर्याने विचार करून तातडीने अंमलबजावणी करावी.

## पुणे विद्यापीठाच्या मेसचा परवाना रद्द, गंभीर त्रुटी निदर्शनास

पुणे (दै. संध्या)




राज्याच्या अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार घेतल्यापासून राज्यात अन्न, औषध आणि प्रतिबंधित पदार्थांविरोधात धडक कारवाया सुरु आहेत. यापूर्वी पुण्यात भेसळीशी संबंधित अनेक कारवाया करण्यात आलेल्या आहेत. आता मात्र थेट पुणे विद्यापीठाच्या कँटिंनबाबत मोठी कारवाई एफडीएने केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मेसचा परवाना रद्द करण्यात आलेला आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे आता पुणे विद्यापीठातील मेस बंद झाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपहारगृहाचे व्यवस्थापन करणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती असून पाण्याच्या गुणवत्तेच्या नोंदीसह अन्न आणि आणि स्वच्छतेच्या बाबतीत अनेक त्रुटी समोर आल्या आहेत.




## श्रीराम फार्म सोल्युशन्सने पीक पोषण उत्पादने केली सादर

छ. संभाजीनगर (दै. संध्या)

डीसीएम श्रीराम लिमिटेडचा एक विभाग असलेल्या श्रीराम फार्म सोल्युशन्सने आपली अत्याधुनिक पीक संरक्षण, विशेष वनस्पती पोषण (स्पेशालिटी प्लांट न्यूट्रिशन) तसेच संशोधनाधारित बियाणे उत्पादने बाजारात सादर केली. आपला पीक संरक्षण उत्पादन पोर्टफोलिओ अधिक बळकट करण्यासाठी कंपनीने श्रीराम सेनकुशा, श्रीराम एडेलॉन आणि श्रीराम झारविन ही तीन नवीन उत्पादने सादर केली. भारतीय शेतकऱ्यांपर्यंत जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान पोहोचविण्याच्या श्रीरामच्या वचनबद्धतेचे हे द्योतक आहे. ही प्रभावी उत्पादने जागतिक नवोन्मेषकांच्या पेटंटप्राप्त तंत्रज्ञानाच्या आधारे काळजीपूर्वक विकसित करण्यात आली असून, आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या पिकांमध्ये आढळणाऱ्या कीड, किडी व रोगांपासून प्रभावी संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आली आहेत.

श्रीराम सेनकुशा हे जपानी तंत्रज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण उत्पादन असून, उच्च मूल्याच्या शेतपिके व फलोत्पादन पिकांमधील प्रमुख लेपिडॉप्टेरन अळ्या तसेच थ्रिप्सच्या प्रभावी नियंत्रणासाठी विकसित करण्यात आले आहे.

# फडणवीस सरकारची अदानी भक्ती

### सामान्य जनतेला स्मार्ट मीटरची सक्ती : स्मार्ट मीटर सक्तीच्या विरोधात पुणेकरांचा लढा

पुणे (दै. संध्या)




अदानीची तिजोरी भरण्याचा नादात फडणवीस सरकारने सामान्य पुणेकरांवर स्मार्ट मीटरची सक्ती सुरू केली आहे. हे स्मार्ट मीटर सर्वसामान्य नागरिकांची लूट करणारे आहे. "स्मार्ट सिटी" बनवण्याचे वचन देऊन सत्तेत आलेले फडणवीस पुणे शहराला उध्वस्त करून नागरिकांच्या माथी स्मार्ट मीटर मारत आहेत. अदानीचा फायदा करण्यासाठी लाखो पुणेकर नागरिकांना फडणीस सरकार लुबाडत आहे. तसेच, MSEB च्या जागेत अदानी कंपनीला कार्यालयासाठी जागा देऊन फडणवीस सरकारने अदानीसमोर थेट लोटांगण घातले आहे.

फडणवीस सरकारच्या या मनमानीच्या विरोधात आक्रोश व्यक्त करण्यासाठी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे (पूर्व) शहराध्यक्ष प्रशांत जगताप व पुणे (पश्चिम) शहराध्यक्षा दिप्ती चवधरी यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. रास्ता भेटीतील MSEB मुख्य कार्यालयाच्या बाहेर असंख्य नागरिकांनी फडणवीस सरकारच्या कारभाराचा निषेध व्यक्त केला. तसेच, काँग्रेस पक्षाच्या वतीने MSEB मुख्य अभियंत्यांना स्मार्ट मीटर संबंधित, MSEB कार्यालय आवारातील अदानीचे कार्यालय हटवण्यासाठी जनतेच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप, पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दिप्ती चवधरी यांच्या समवेत नगरसेविका अश्विनी लांडगे, सायरा शेख, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, संगीता पवार, यशराज पारखी, भाऊसाहेब आजबे, द. स. पोळेकर, रमेश सोनकांबळे, सुरेश कांबळे, अविनाश अडसुळ, मजहर मणियार, सुनिल पंडित, संजय कवडे, दिपक ओव्हाळ, चेतन अगरवाल, सतिश पवार, अकबर शेख, वाल्मिक जगाप, दादाश्री कामठे, भगवान कद्दू, संतोष सुपेकर, अमित कांबळे, माऊली मोरे, पप्पु घोलप, आसिफ शेख, जुबेरबाबु शेख, आयुब पठाण, परवीन तांबोळी, जिनाद सय्यद आदींसह काँग्रेस पक्षाचे असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व पुणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## जयमल्हार फाउंडेशनच्या वतीने वन्यजीवांसाठी सलग बारा वर्षे पाणी व धान्य

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी जयाद्री डोंगर रांगेतील कडेपठार पायथ्याशी असणाऱ्या वन विभागाच्या पाणवठ्यात जेजुरी येथील जयमल्हार फाउंडेशनच्या वतीने वन्य प्राणी व पक्षांसाठी सलग बारा वर्षे टँकर द्वारे पाणी व धान्य ठेवण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. जेजुरी कडेपठार डोंगर रांगेत बिबटे, कोल्हे,लांडगे, हरिण, ससे, तरस तसेच मोर, घुबड, घार आदी वन्य जीवांचे वास्तव्य आहे. नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटल्या नंतर पाण्याठ्यातील पानी संपल्याने वन्यजीव गावाकडे येतात अशा वेळी कुत्र्यांपासून त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. या वन्यजीवांचे रक्षण व्हावे त्यांना उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळावे या हेतुन जेजुरी येथील जयमल्हार फाऊंडेशनचे अध्यक्ष विशाल बारभाई आणि मित्र परिवाराच्या वतीने सलग 12 वर्षे वनविभागाच्या पाणवठ्यात लोकसहभागातून टँकर द्वारे पाणी सोडून वन्यजीवांची तहान भागवली जाते तर वन्य पक्षांना धान्य ठेवून त्यांची भूक भागवली जाते. जेजुरी व परिसरातील अनेक नागरिक वाढदिवस, विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने वन्यजीवांसाठी टँकरची सुविधा उपलब्ध करत असतात. 21 मार्च रोजी या उपक्रमाला सर्वात करण्यात आली असून दर दिवसाआड पाणी देण्याची व्यवस्था केली जाते. जो पर्यंत पाऊस पडून पाणवठ्यात पाणी येत नाही तो पर्यंत हा उपक्रम सुरू ठेवणार असल्याचे विशाल बारभाई यांनी सांगितले.

## शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाबाबत अधिकारांचे विकेंद्रीकरण

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा, कार्यशाळा आदी संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाच्या देयक प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी दिव्यांग सक्षमीकरण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार थकीत वेतन अदा करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच मुंबई शहर व उपनगरातील जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले असल्याची माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी दिली. मंत्री अतुल सावे म्हणाले, यापूर्वी थकीत वेतन अदा करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेणे आवश्यक होते. मात्र, नियमित व थकीत वेतन वितरणाची प्रक्रिया अधिक गतिमान आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने आता संबंधित अधिकाऱ्यांना हे अधिकार देण्यात आले आहेत. जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रकरणांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या माध्यमातून तपासणी करून थकीत वेतन निधी वितरित करावे. तर मुंबई शहर व उपनगरातील प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी यांनी संबंधित लेखाधिकारी यांच्या माध्यमातून तपासणी करून थकीत वेतन प्रस्तावांना मंजुरी देण्यात येणार आहे. थकीत वेतन अदा करण्यापूर्वी संबंधित रक्कम नियमांनुसार देय आहे की नाही, याची निश्चित करण्यात आलेल्या तपासणी सूचीप्रमाणे पडताळणी करणे बंधनकारक राहणार आहे. न्यायालयीन निर्णयांमुळे देय झालेल्या थकबाकीच्या प्रकरणांसह इतर सर्व प्रकारच्या थकीत वेतनाच्या प्रकरणांनाही ही अट लागू असेल. दरम्यान, यापूर्वी अदा करण्यात आलेल्या थकबाकीच्या प्रकरणांची विशेष तपासणी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, पुणे यांच्या विशेष पथकाकडून या प्रकरणांची सविस्तर चौकशी करण्यात येणार असून ९० दिवसांत शासनाला अहवाल सादर केला जाणार आहे. तपासणीत नियमबाह्य पद्धतीने थकबाकी किंवा इतर लाभ देण्यात आल्याचे आढळल्यास संबंधितांकडून त्या रकमेची वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे दिव्यांगांच्या विशेष शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाच्या प्रकरणांचा निपटारा अधिक जलद व पारदर्शक पद्धतीने होण्यास मदत होणार असल्याचे मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

## 'डॉन' उपक्रमातून व्यसनमुक्तीचा जागर : चेंबूरमध्ये तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग

मुंबई (दैनिक संध्या) : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (डीएलएसए), मुंबई यांनी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'ड्रग अवेअरनेस अँड वेलनेस नेव्हिगेशन स्कीम' (DAWN) अंतर्गत चेंबूर पूर्व येथील प्रथम एज्युकेशन सेंटरमध्ये व्यसनमुक्ती आणि आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय संचालक व कार्यकारी समिती सदस्य श्री. बॉस्को डिसोझा हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी अमली पदार्थांचे विविध प्रकार, त्यांचा गैरवापर आणि त्याचे व्यक्ती, कुटुंब व समाजावर होणारे गंभीर परिणाम याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी वैयक्तिक व सामुदायिक स्तरावर कोणती ठोस पावले उचलता येतील, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून, चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवून आणि आपली मते मांडून व्यसनमुक्त व आरोग्यदायी समाज घडविण्याचा दृढ निर्धार व्यक्त केला. त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी आणि संवादात्मक ठरला.

# इसुझूचा देशव्यापी 'आय-केअर प्री-मान्सून सर्व्हिस कॅम्प'

## १८ ते २४ जूनदरम्यान आकर्षक सवलती

चेन्नई (दै. संध्या) :




वाहनधारकांना उत्तम सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने इसुझू मोटर्स इंडियाने देशभरात मान्सूनपूर्व वाहन सेवा शिबिर आयोजित करण्याची घोषणा केली आहे. हे विशेष शिबिर १८ ते २४ जून २०२६ या कालावधीत कंपनीच्या सर्व अधिकृत सेवा केंद्रांवर भरविण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश वाहनांची मान्सूनपूर्व तपासणी करून सुरक्षित, सुरळीत आणि अडथळामुक्त प्रवास सुनिश्चित करणे हा आहे. शिबिरादरम्यान वाहनांची मोफत ३७ मुद्द्यांवरील सर्वंकष तपासणी करण्यात येणार असून विविध सेवा व सुट्या भागांवर विशेष सवलती देण्यात येणार आहेत.

शिबिरात सहभागी होणाऱ्या वाहनधारकांना कामगार शुल्कावर १० टक्के, सुट्या भागांवर ५ टक्के, स्नेहक व इतर द्रव्यांवर ५ टक्के, रस्ते सहाय्य सेवांवर २० टक्के, वाहन देखभाल योजनेवर ५ टक्के तसेच वाढीव हमी योजनेवर २० टक्के सवलत मिळणार आहे. या सवलतींसाठी काही अटी लागू राहतील.

अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, लातूर, नागपूर, नाशिक, पुणे, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, यवतमाळ यांसह देशातील अनेक शहरांतील अधिकृत सेवा केंद्रांवर हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

वाहनधारकांनी आपल्या जवळच्या अधिकृत सेवा केंद्राशी संपर्क साधून आगाऊ नोंदणी करावी, असे आवाहन कंपनीने केले आहे.

## भारती एअरटेलमध्ये राहुल वत्स यांना बढती

नवी दिल्ली (दै. संध्या) :



■ समूह मुख्य नियामक अधिकारी आणि कॉर्पोरेट व्यवहार संचालकपदी नियुक्ती

देशातील आघाडीची दूरसंचार सेवा कंपनी भारती एअरटेलने राहुल वत्स यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये वाढ करत त्यांची समूह मुख्य नियामक अधिकारी आणि कॉर्पोरेट व्यवहार संचालक म्हणून नियुक्ती केली आहे. या नव्या भूमिकेत ते कंपनीच्या कॉर्पोरेट व्यवहार विभागाचे नेतृत्व करणार असून उद्योग क्षेत्र, सरकार आणि नियामक संस्थांशी समन्वय साधण्याची महत्त्वाची जबाबदारी सांभाळणार आहेत. राहुल वत्स हे कंपनीच्या सार्वजनिक धोरणे आणि नियामक धोरणांच्या आखणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. तसेच सरकार आणि विविध नियामक संस्थांशी संवाद साधण्यासाठी ते कंपनीचे प्रमुख प्रतिनिधी म्हणून कार्य करतील. दूरसंचार क्षेत्राबरोबरच इतर व्यवसाय क्षेत्रांतही विस्तार करणाऱ्या एअरटेलने कॉर्पोरेट व्यवहार विभाग अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे.

## पक्षांतर करणाऱ्या खासदारांविरोधात घरासमोर आंदोलनाचा काँग्रेसचा इशारा

पुणे (दै. संध्या) :



इंडिया आघाडीच्या तिकिटावर निवडून आलेले खासदार सत्ताधारी पक्षात प्रवेश करत असतील, तर तो मतदारांच्या जनादेशाशी विश्वासघात असल्याचा आरोप करत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी अशा खासदारांच्या घरांसमोर तीव्र निषेध आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात तिवारी यांनी म्हटले आहे की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत जनतेने संविधानाचे संरक्षण, लोकशाही मूल्यांचे जतन आणि केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात स्पष्ट जनादेश दिला होता. या पार्श्वभूमीवर विरोधी आघाडीच्या पाठिंब्यावर निवडून आलेले खासदार पक्षांतर करत असतील, तर ते मतदारांचा विश्वासघात करणारे कृत्य ठरेल. तिवारी यांनी दावा केला की, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या खासदारसंख्येत लक्षणीय वाढ झाली असून देशातील जनतेने सशक्त विरोधी पक्षाला पाठिंबा दिला आहे. दुसरीकडे, भाजपला अपेक्षित यश मिळाले नसून केंद्रातील सरकार हे मित्रपक्षांच्या पाठिंब्यावर सत्तेत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील संभाव्य पक्षांतराच्या चर्चांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, इंडिया आघाडीतील उमेदवारांना निवडून आणण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतले आहेत. त्यामुळे जनतेच्या कौलाच्या विरोधात जाऊन पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींविरोधात काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील.

## आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे 'झॅगनेलीस प्रोटेक्ट' सादर

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ वाहन उद्योगासाठी आयातीला देशी पर्याय




आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाने वाहन उद्योगासाठी विकसित करण्यात आलेल्या 'झॅगनेलीस प्रोटेक्ट' या अत्याधुनिक संरक्षक-लेपित पोलाद उत्पादनाची घोषणा केली आहे. युरोपमध्ये यशस्वी ठरलेले हे पेटंट प्राप्त तंत्रज्ञान आता प्रथमच भारतात उपलब्ध झाले असून, अशा प्रकारचे उच्च दर्जाचे पोलाद आतापर्यंत पूर्णपणे आयात केले जात होते.

झिंक, ॲल्युमिनियम आणि मॅग्नेशियमच्या विशेष संरक्षक लेपाने तयार केलेले हे प्रीमियम पोलाद वाहन उद्योगातील महत्त्वाच्या भागांसाठी वापरण्यात येणार आहे. या उत्पादनामुळे वाहन उत्पादकांना कमी कालावधीत पुरवठा, सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि विश्वासार्ह उपलब्धतेचा लाभ मिळणार आहे.

या नव्या उत्पादनाचा प्रारंभिक वापर वाहनांमधील खिडक्या, आरसे, वायपर आणि आसन यंत्रणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विद्युत मोटारींच्या संरक्षण कवचासाठी केला जाणार आहे. प्रत्येक वाहनात अशा अनेक मोटारींचा वापर होत असल्याने या उत्पादनाचा त्वरित लाभ वाहन उद्योगाला मिळणार आहे.

सध्या देशातील वाहन उद्योगात वापरल्या जाणाऱ्या काही विशेष पोलाद प्रकारांपैकी सुमारे ८ ते १० टक्के पोलाद आयात केले जाते. भारतात दरवर्षी ३ कोटींपेक्षा अधिक वाहने तयार होत असून, गंजरोधक आणि वजनाने हलक्या साहित्याची मागणी सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत देशातच या दर्जाचे उत्पादन उपलब्ध होणे वाहन उद्योगासाठी महत्त्वाचे मानले जात आहे.

कंपनीचे विक्री व विपणन विभागाचे संचालक आणि उपाध्यक्ष रंजन धर यांनी सांगितले की, या उत्पादनामुळे भारतातील वाहन उद्योगाला जागतिक दर्जाचे साहित्य देशांतर्गत उपलब्ध होणार आहे. तसेच आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन 'आत्मनिर्भर भारत' अभियानाला बळ मिळेल.

झॅगनेलीस प्रोटेक्ट हे पारंपरिक संरक्षक-लेपित पोलादापेक्षा अधिक गंजरोधक मानले जाते. विशेषतः कापलेल्या कडा, जोड भाग आणि आकार दिलेल्या घटकांमध्ये हे अधिक संरक्षण देते. तसेच स्वतःहून गंज रोखण्याची क्षमता, उत्कृष्ट आकारक्षमतेसह दीर्घकालीन टिकाऊपणा हे या उत्पादनाचे वैशिष्ट्य आहे.

मोटार संरक्षण कवचांव्यतिरिक्त वाहनांच्या तळरचनेतील भाग, दरवाज्यांचे आतील भाग, इंजिन आच्छादनाचे आतील भाग तसेच मागील झाकणाच्या आतील भागांसाठीही या उत्पादनाचा वापर करता येणार आहे.

## ड्रीमेची नवी रोबोटिक स्वच्छता यंत्रे भारतात; स्वयंचलित घरगुती स्वच्छतेला नवे बळ

नवी दिल्ली (दै. संध्या) :




स्मार्ट गृहउपकरण क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतीय बाजारपेठेत दोन नवीन प्रीमियम रोबोटिक स्वच्छता यंत्रे सादर केली आहेत. 'एल५०एस प्रो अल्ट्रा' आणि 'एल५० अल्ट्रा सीई' या नव्या श्रेणीतील यंत्रांमुळे घरगुती स्वच्छतेचा अनुभव अधिक सुलभ, बुद्धिमान आणि प्रभावी होणार असल्याचा दावा कंपनीने केला आहे.

ही दोन्ही उत्पादने १६ जूनपासून विक्रीसाठी उपलब्ध झाली असून एल५०एस प्रो अल्ट्राची किंमत ७९ हजार ९९९ रुपये, तर एल५० अल्ट्रा सीईची किंमत ६४ हजार ९९९ रुपये ठेवण्यात आली आहे.

भारतीय घरांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या यंत्रांमध्ये अत्यंत शक्तिशाली धूळ शोषण क्षमता, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मार्गदर्शन प्रणाली, अडथळे ओळखण्याची आणि टाळण्याची क्षमता, कोपरे व कडा स्वच्छ करण्याची सुविधा तसेच गालिच्यांसाठी स्वतंत्र स्वच्छता तंत्रज्ञान देण्यात आले आहे.

एल५०एस प्रो अल्ट्रामध्ये ३० हजार पास्कल इतकी धूळ शोषण क्षमता असून ते ४० मिलीमीटर उंचीपर्यंतचे अडथळे सहज पार करू शकते. गरम पाण्याद्वारे स्वतःची स्वच्छता करणारी पुसणी प्रणाली, केसांचा गुंता टाळणारी दुहेरी ब्रश रचना आणि स्वयंचलित धूळ संकलन, पाणी भरणे व पुसणी स्वच्छता करणारे बहुउपयोगी केंद्र हे त्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

तर एल५० अल्ट्रा सीईमध्ये २५ हजार पास्कल धूळ शोषण क्षमता, स्वयंचलित धूळ रिकामी करण्याची व्यवस्था, गरम पाण्याने पुसणी स्वच्छता, कोपऱ्यांपर्यंत पोहोचणारी विस्तारणारी ब्रश प्रणाली आणि गालिच्यांसाठी स्वतंत्र स्वच्छता सुविधा देण्यात आली आहे. दोन्ही यंत्रांमध्ये घराचा नकाशा तयार करण्याची क्षमता, भ्रमणध्वनीवरील अनुप्रयोगाद्वारे नियंत्रण, आवाजावर आधारित आदेश स्वीकारण्याची सुविधा तसेच पाळीव प्राणी असलेल्या घरांसाठी विशेष स्वच्छता व्यवस्था उपलब्ध आहे.

ड्रीमे टेक्नॉलॉजी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा यांनी सांगितले की, भारतीय ग्राहक आता घरगुती व्यवस्थापनासाठी अधिक प्रगत आणि सर्वसमावेशक उपायांची अपेक्षा करत आहेत. या नव्या उत्पादनांमुळे दैनंदिन जीवन अधिक सोयीस्कर होण्यास मदत होईल.

या दोन्ही उत्पादनांवर एक वर्षाची हमी देण्यात आली असून देशातील १६० हून अधिक शहरांमध्ये विक्रीनंतरची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र ठिकाणी घरपोच उचल-परत सेवा आणि प्रत्यक्ष बसवून देण्याची सुविधाही कंपनीकडून देण्यात येणार आहे.

## विद्यार्थ्यांनी संशोधक वृत्ती जोपासत तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करावेत

### माजी कुलगुरू डॉ. पी. के. सिन्हा यांचे प्रतिपादन




पुणे (दै. संध्या) :

"मानवी भवताल वेगाने बदलत असून, तंत्रज्ञानातील बदलांची गती सर्वाधिक आहे. आपल्याला २०४७ पर्यंत विकसित श्रेणीत पोहोचण्यासाठी युवा पिढीला नव्या काळानुरूप स्वतःमध्ये आणि भवतालामध्ये अनुरूप परिवर्तन घडवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी तरुणांनी संशोधक वृत्ती जोपासत झपाट्याने बदलणारे तंत्रज्ञान अवगत करावे," असे प्रतिपादन इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) रायपूरचे माजी कुलगुरू व संचालक डॉ. पी. के. सिन्हा यांनी केले. भारत विश्वगुरू होण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतही पूरक बदल आवश्यक असून, त्यासाठी 'इग्नाईट २०२६' यांसारख्या तांत्रिक परिषदांमधून पाठबळ मिळेल, असेही ते म्हणाले. येवलेवाडी येथील केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्स संचालित केजे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट रिसर्चतर्फे इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर्स (आयईईई) पुणे विभाग, यांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित इनोव्हेशन अँड ग्रोथ इन नेक्स्ट-जन इंटेलिजंट टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग (इग्नाईट) २०२६ या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनावेळी डॉ. सिन्हा बोलत होते. नगर रस्त्यावरील हॉटेल हयात येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष कल्याण जाधव होते. यावेळी स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले.

## वयाची तीन वर्षे पूर्ण होण्याआधीच 'इयारा'च्या नावे चौदा प्रकारचा दस्तऐवज

हडपसर (दै. संध्या) :

हडपसर येथील जमादार कुटुंबात तब्बल ५५ वर्षांनंतर मुलगी म्हणून जन्म घेतलेल्या 'इयारा'च्या नावे वयाची तीन वर्षे पूर्ण होण्याआधीच टपाल कार्यालयातील चार खात्यांसह चौदा प्रकारचा दस्तऐवज तयार झाला आहे. असा विक्रम नोंदविणारी अल्पसंख्याक समाजातील ती पहिली मुलगी असल्याचा दावा तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. कुटुंबात तब्बल ५५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर तीन वर्षांपूर्वी जन्म घेतलेल्या इयाराचे घरात उत्साहात स्वागत करण्यात आले. तीचा जन्म होताच तिच्या कुटुंबीयांनी पंतप्रधानांच्या "मुलगी वाचवा- मुलगी शिकवा" हा संदेश पूर्ण क्षमतेने अंमलात आणण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जन्म दाखला, आधार कार्ड या सुरुवातीच्या नोंदी बरोबरच तिचे पॅन कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, आरोग्य विमा, पोस्टातील सुकन्या समृद्धी योजना, बचत खाते, पब्लिक प्रॉव्हिडंट फंड, मासिक बचत, अशा सरकारी योजनांसह एस.आय.पी., म्युच्युअल फंड, डिजिलॉकर्स, उत्पन्न विवरण पत्र (आयटीआर) व डिमॅट असा चौदा प्रकारचा दस्तऐवज तयार करण्यात आला आहे.

## अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण जातीय जनगणनेनंतरच करावे : उपमहापौर परशुराम वाडेकर

### रामदास आठवले यांच्या भूमिकेचा विपर्यास करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न निंदनीय

पुणे (दै. संध्या) :




अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करणे हे समाजात अंतर्गत फूट निर्माण करणारे ठरू शकते. त्यामुळे पक्षाचा त्याला प्राथमिक विरोध आहे. मात्र, उपवर्गीकरण करायचेच असल्यास ते लोकसंख्येच्या अचूक प्रमाणावर आधारित असावे आणि राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे नेते परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत केली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनानुसार ही भूमिका मांडण्यात आली. यावेळी पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, नगरसेवक निलेश अल्हाट, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले, बसवराज गायकवाड, गोविंद साठे आदी उपस्थित होते. वाडेकर म्हणाले की, अनुसूचित जातींतील विविध घटक सामाजिक हक्कांसाठी अनेक वर्षांपासून एकत्रितपणे संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत घाईघाईने घेतलेल्या निर्णयामुळे समाजातील ऐक्याला तडा जाण्याची शक्यता आहे. जनगणनेतून प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या समोर आल्यानंतरच कोणतेही धोरणात्मक निर्णय घेतल्यास सर्व घटकांना न्याय मिळू शकेल. राज्यातील उर्वरित ५८ अनुसूचित समाजघटकांनाही शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात समान संधी मिळाव्यात, अशी पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे- ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२१७६५
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- integratedpune.ee@mahapwd.gov.in

ई-निविदा सूचना क्रमांक ०९ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत / अनोंदणीकृत पात्र कंत्राटदारांकडून बी-१/बी-२/ क निविदा नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. वरील निविदा सुचनेत कामे समाविष्ठ असुन या निविदा सुचनेची संपुर्ण माहिती खालिल संकेत स्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. http://mahatenders.gov.in

सही/-
(अनुराधा रा. भंडारे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
पुणे-४११००१.

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C1172

## थोडक्यात पण महत्वाचे...



## पाणीटंचाईचे संकट; जलतरण तलाव, वॉशिंग सेंटर्स बंद ठेवण्याचे महापौरांचे आदेश

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना आणि आंद्रा धरणातील पाणीसाठ्यात मोठी घट झाल्याने शहरावर पाणी कपातीचे संकट गडद झाले आहे. पवना धरणातील पाणीसाठा केवळ २० टक्क्यांवर तर आंद्रा धरणातील साठा २९ टक्क्यांवर आला आहे. यंदा पावसाने दडी मारल्यामुळे धरणांमधील उपलब्ध पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत असून, पाटबंधारे विभागाने महापालिकेला १५ टक्के पाणी कपात करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने पाणी बचतीसाठी तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. पाणीपुरवठा विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, पुढील पंधरवड्यात पाणी कपातीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येण्याची शक्यता आहे. दरम्यान, शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापौर रवी लांडगे यांनी प्रशासनाला कठोर पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. शहरातील सर्व जलतरण तलाव तातडीने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, पाण्याचा अपव्यय करणाऱ्या वॉशिंग सेंटर्सही बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. महापौरांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करताना स्पष्ट केले की, पाण्याची नासाडी करणाऱ्या नागरिकांवर आणि व्यावसायिक आस्थापनांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले आहेत. याशिवाय, ज्या भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे किंवा पाणीपुरवठा होणार नाही, त्या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती महापौर रवी लांडगे यांनी दिली. शहरातील पाणीसंकट अधिक तीव्र होऊ नये यासाठी नागरिकांनी पाणी बचतीत सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.



## पोलिसांवर गोळीबार करणारा सराईत गुन्हेगार अखेर जेरबंद

पिंपरी (दैनिक संध्या) : पोलिसांवर गोळीबार करून उसाच्या शेतातून फरार झालेला आणि तब्बल ७० हून अधिक चोरीच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेला सराईत गुन्हेगार अखेर पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने रचलेल्या अचूक सापळ्यात आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शेखर संभाजी जाधव असे आहे. पोलिसांनी त्याच्याकडून सुमारे ५१ हजार रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त केले आहे. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ मे रोजी दिघी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेखर जाधव आणि त्याच्या तीन साथीदारांनी पोलिसांवर गोळीबार करत खुनाचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतर सर्व आरोपी फरार झाले होते. तपासादरम्यान शेखर जाधव आणि त्याचा साथीदार मुस्तफा उर्फ भाईजान हे रांजणगाव परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मात्र पोलिसांचा माग लागल्याचे लक्षात येताच आरोपींनी पुन्हा एकदा पोलीस पथकावर गोळीबार करत पलायन केले. या प्रकरणी रांजणगाव पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## देहू-आळंदी पंचक्रोशीला मिळणार 'संतभूमी'चा दर्जा - आमदार शंकर जगताप

पिंपरी (दैनिक संध्या) : वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र देहू आणि श्री क्षेत्र आळंदी या पवित्र भूमीला 'संतभूमी' म्हणून घोषित करावे, अशी आग्रही मागणी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राला संतांची मोठी परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर माउलींची संजीवन समाधी आळंदी येथे, तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे वास्तव्य आणि वैकुंठगमन देहू येथे झाले आहे. या दोन्ही ठिकाणांमधील १६ किलोमीटरचा परिसर वारकरी परंपरा, अध्यात्म आणि संत साहित्याने समृद्ध आहे. लाखो भाविकांचे हे अत्यंत श्रद्धेचे केंद्र असल्याने, या परिसराचे जतन आणि गौरव करणे काळाची गरज असल्याचे आमदार जगताप यांनी पत्रात नमूद केले आहे. उत्तराखंड राज्याने ज्याप्रमाणे आपल्या परिसराचा 'देवभूमी' म्हणून गौरव केला आहे, त्याच धर्तीवर देहू ते आळंदी या पंचक्रोशीला 'संतभूमी' म्हणून कायदेशीर दर्जा मिळावा, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि वारकरी समाजातून होत आहे. याचा गांभीर्याने विचार करून सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार जगताप यांनी पत्राद्वारे केली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा गौरव वाढण्यासोबतच, वारकरी संप्रदायाचा सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे.

## क्षेत्रीय कार्यालयाबाहेर कुत्र्यांचा सुळसुळाट

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी येथील पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'फ' क्षेत्रीय कार्यालय परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेरच भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून नागरिकांना जीव मुठीत धरून ये-जा करावी लागत असल्याची तक्रार समोर आली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, परिसरात अनेक भटकी कुत्री दिवसभर वावरत असल्याने कार्यालयात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा कुत्र्यांच्या टोळक्यांमुळे नागरिकांना रस्ता बदलून जावे लागते, तर काहींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. भटक्या कुत्र्यांचे निर्बीजकरण, लसीकरण आणि नियंत्रणासाठी आवश्यक पावले उचलण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी या प्रश्नाकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. फ क्षेत्रीय कार्यालयासारख्या महत्त्वाच्या शासकीय ठिकाणीच भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट होत असल्याने महापालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित आरोग्य अधिकारी व सुरक्षा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि आवश्यक असल्यास दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणीही सचिन काळभोर यांनी केली आहे.

# वीज समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढा

**खासदार श्रीरंग बारणे यांचे निर्देश, महावितरणाचा गलथान कारभार खपवून घेणार नाही**

पिंपरी (दै. संध्या)



मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल, उरण, नेरळ आणि कर्जत या भागातील वीज समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढावा. भविष्यात दहा ते बारा तास वीज जाण्यासारखा घटना घडू नयेत. ग्राहकांना नाहक त्रास होऊ नये. यासाठी डीपीची क्षमता वाढवावी, अशा सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

खासदार श्रीरंग बारणे यांनी पनवेल, उरण, नेरळ आणि कर्जत या भागातील विद्युत विषयक समस्यांबाबत पनवेल महापालिकेत विद्युत विभागाची सोमवारी आढावा बैठक घेतली. या बैठकीला विद्युत अधीक्षक अभियंता दिपक पाटील, अधीक्षक अभियंता धिरज बिक्कड, कार्यकारी अभियंता पनवेल शहर जितेंद्र माने, कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण देशमुख, कार्यकारी उप अभियंता संजय ठाकूर, पनवेल शहर उप कार्यकारी अभियंता पनवेल शहर श्रीनिवास बोबडे, उप कार्यकारी अभियंता कर्जत चंद्रकांत केंद्रे, उप कार्यकारी अभियंता खालापूर अमित कुरंगळे, उप कार्यकारी अभियंता खोपोली, वाघमोडे, नगरसेवक श्री. रामदास शेवाळे, नगरसेवक प्रथमेश सोमण, नगरसेविका सायलीताई तुकाराम सरक, शिवसेना कळंबोली शहर प्रमुख श्री तुकाराम सरक, जगदीश ठाकूर,युवासेना उत्तर पनवेल जिल्हा प्रमुख, रोशन पुजारी भरत जाधव, परमेश्वर काळे, उपस्थित होते. यावेळी पनवेल शहरातील कामोठे, कळंबोली आणि खांदा कॉलनी या भागातील वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना खासदार बारणे यांनी स्पष्ट सूचना दिल्या. तसेच या बैठकीत तिन्ही विभागांतील वीज प्रवाहित करण्याच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

खासदार बारणे म्हणाले, मागील आठ दिवसांपूर्वी पनवेल शहरी भागात वीजेची समस्या निर्माण झाली होती.

दिशा कमिटीच्या बैठकीत विद्युत विषयक कामांना सूचना देण्याच्या सूचना दिल्या जातात. राज्य सरकारच्या माध्यमातून प्रस्वात दिला जातो. ग्राहक वाढतात तेथे सबस्टेशन वाढविले पाहिजे. त्यासाठी केंद्र, राज्य शासनाकडून मोठा निधी मिळतो. या परिसरात मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध झाल्या आहेत. शहरी भागात चार ठिकाणी आणि ग्रामीण भागात तीन ठिकाणी सबस्टेशन उभारण्यात येणार आहेत. पुढील तीन महिन्यात त्याचे काम पूर्ण होईल. त्यामुळे ग्राहकांना त्रास होणार नाही. पावसाळ्यापूर्वी विद्युत वाहिन्या बदलण्यात येणार आहेत. कामोठे येथे पाच केव्हीचे विद्युत उपक्रेंद्राचे काम पूर्ण झाले आहे.

२२० केव्हीचे उपकेंद्र चालू आहे. त्याचा खारगरला फायदा होईल. पनवेल शहरी भागात अंडरग्राऊड केबलचा १५५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे गेला आहे. शहरात शंभर टक्के अंडरग्राऊड केबल होईल. त्यामुळे वीजपुरवठा खंडीत होणार नाही. डीपीची क्षमता वाढवावी. भविष्यात ग्राहकांना वीज समस्येला सामोरे जावे लागू नये. वीजपुरवठा खंडीत झाल्यास तत्काळ दुरुस्त करावा.

## मातंग समाजाच्या न्याय हक्कांसाठी 'संगमवाडी ते मुंबई' पदयात्रा; शिवशाही व्यापारी संघाचा जाहीर पाठिंबा!

पिंपरी (दै. संध्या)



अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण,मातंग समाजाच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी उद्या(दि.१७) अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने एका भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. अण्णाभाऊ साठेंचे वंशज सचिनभाऊ साठे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली ही पदयात्रा निघणार आहे.उद्या सकाळी संगमवाडी येथील आद्यक्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे स्मारकापाशी समाधीला नतमस्तक होऊन या पदयात्रेची अधिकृत सुरुवात होऊन पुण्यातून मुंबईतील ऐतिहासिक आझाद मैदानाकडे पायी आगेकूच करणार आहे. या पदयात्रेला शिवशाही व्यापारी संघ आणि हिंदू मातंग सेनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे अशी माहिती संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली आहे.

प्रसिद्धी माध्यमांसमोर आपली भूमिका मांडताना दाखले म्हणाले की, अनुसूचित जातीच्या (SC) आरक्षणात 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण लोकसंख्येच्या प्रमाणात तात्काळ लागू करण्यात यावे.साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर 'भारतरत्न' या देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे.वाटेगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक तात्काळ उभारण्यात यावे, तसेच घाटकोपर येथील स्मारकाचा पूर्ण विकास करण्यात यावा.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या बजेटमध्ये भरीव वाढ करण्यात यावी.समाजासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या स्मशानभूमी व गायरान जमिनीचा प्रश्न शासनाने तात्काळ मार्गी लावावा यासाठी या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे.

ज्या अण्णाभाऊ साठेंनी आपली 'फकिरा' ही जगप्रसिद्ध कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्पित केली, त्यांच्याच महाराष्ट्रात आज मातंग समाज, बौद्ध-महार बांधव, चर्मकार बांधव व इतर ५८ ते ५९ जाती राज्य पातळीवर कुठेतरी नाराज आहेत.रशियासारख्या देशात अण्णाभाऊंचे पुतळे आणि स्मारकं उभारली जातात, मात्र दुर्दैवाने आपल्या महाराष्ट्रात त्यांचे स्मारक अजूनही वंचित आहे. आंदोलनाच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि सुनेत्रावहिनी पवार यांना विनंती करण्यात आली आहे की, आगामी पावसाळी अधिवेशनामध्येच हे उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनीही बहुजन समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक प्रगतीसाठी यात लक्ष घालावे, अशी कळकळीची विनंती करण्यात आली असल्याची भावना दाखले यांनी व्यक्त केली.

पिंपरी-चिंचवड शहरातील अण्णाभाऊ साठेंच्या स्मारकासाठी आणि स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी योगदान देणारे शेणमजराव रिटे यांनीही या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे.

या पदयात्रेचे स्वागत श्री. रविंद्र खिलारे, राम पात्रे,झुंबरलाई भगवान शिंदे, श्री. प्रल्हाद सुधारे, नगरसेविका अनुराधाताई गोरखे, सौ. कमलताई घोलप, सौ. आशाताई शहाणे, सो. केशरलाई लांडगे, श्री. अण्णासाहेब कसबे, श्री. दत्तू चव्हाण, श्री. सुनिल भिसे,श्री. शिवाजी खडसे, श्री.कृष्णा साबळे, सौ.अर्चना शिंदे, सॉ.अनिता वैरागळ,श्री. नितीन घोलप, श्री. विकास जगधने, श्री. सतीष भवार, श्री. नरेश जोगदंड,श्री. वसंत खलसे. सॉ.सुमनताई नेटके, उद्योजक नानासाहेब वाघचौरे,उद्योजक जयाभाऊ नेटके, उद्योजक अनिल गायकवाड, श्री. नेताजी शिंदे,श्री. अनिल सॉदडे, श्री. राजू भावळे, श्री. अविनाश शिंदे,सुरज अण्णा कांबळे,श्री. चंद्रकांतदादा लोंढे, श्री. सचिन दुनघव, समीरा राजगुरु, रामेश्वर बावणे हे करणार आहेत.

## वाढत्या गैरप्रकारांमुळे नागरिक त्रस्त

**तातडीने उपाययोजना करण्याची नगरसेविका अनिता काटे यांची मागणी**

पिंपळे सौदागर (दै. संध्या)



पिंपळे सौदागर येथील लिनिअर गार्डन परिसरात वाढत असलेल्या गैरप्रकारांमुळे नागरिक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नगरसेविका अनिता संदीप काटे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आणि सांगवी पोलिसांकडे केली आहे.

याबाबत अनिता काटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपळे सौदागर-रहाटणी परिसरातील लिनिअर गार्डन हे नागरिकांसाठी फिरणे, व्यायाम करणे आणि विरंगुळाचे महत्त्वाचे ठिकाण आहे. मात्र अलीकडच्या काळात येथे काही व्यक्तींकडून मद्यपान, धूम्रपान, गोंधळ घालणे तसेच सार्वजनिक ठिकाणी अशोभनीय वर्तन केल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना त्रास सहन करावा लागत असून परिसरातील सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. काही युवकांकडून वाहनांमध्ये बसून मद्यपान व धूम्रपान केल्याच्या घटनाही घडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नगरसेविका अनिता काटे यांनी प्रशासनाकडे या परिसरात नियमित पोलिस गस्त वाढविणे, सायंकाळच्या वेळी विशेष सुरक्षा व्यवस्था करणे, सीसीटीव्ही यंत्रणांची तपासणी व देखरेख मजबूत करणे तसेच नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

"नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा विषय गंभीर असून तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात," अशी मागणी त्यांनी संबंधित विभागांना केली आहे. या निवेदनानंतर महापालिका प्रशासन आणि पोलिस विभाग कोणती पावले उचलतात, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## एआय साठी जास्त रोजगार आणि गुंतवणूक भविष्यात भारतामध्ये - विवेक वेलणकर

**एआय अँड एमएल साठी ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्स, बीएससी (ऑनर्स) उपयुक्त - डॉ. संजय गांधी**

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी, पुणे (दि.१५ जून २०२६) एआय बाबत सर्वत्र उत्सुकता आणि भीती निर्माण झाली आहे. संगणक आणि मोबाईल ज्याप्रमाणे आपण सहजपणे स्वीकारला आणि आता ते आपल्या जीवनाचा एक भाग झाला आहे. त्याचप्रमाणे पुढील काळात एआय देखील सर्वसामान्यांच्या जीवनाचा एक भाग असेल. भारत देश हा जगात या एआय वापरामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. आयटी कंपन्या आणि त्यांच्याशी संबंधित सेवा या सर्वात जास्त भारतात आहेत, त्यामुळे एआयशी संबंधित सर्वात जास्त रोजगार आणि गुंतवणूक भविष्यकाळात भारतामध्ये होईल अशी अपेक्षा करियर मार्गदर्शक विवेक वेलणकर यांनी व्यक्त केली. पुण्यातील ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्स या संस्थेच्या आणि रायगड मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी (बाटु) यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या करिअर मार्गदर्शन मेळाव्यात वेलणकर बोलत होते. यावेळी बाटुचे कुलसचिव डॉ. अमित शेष, ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्सचे संस्थापक, सीईओ डॉ. संजय गांधी, आयआयटी वाराणसीचे डॉ. शैलेंद्र शुक्ला, रिलायन्स जिओ प्लॅटफॉर्मचे उप व्यवस्थापक मंदार हलभावी, उद्योजक मनोज देशमुख आणि प्रशांत पुंड आदी उपस्थित होते. विवेक वेलणकर यांनी सांगितले की, शिक्षण, शेती, उद्योग, सेवा, वैद्यकीय, वाणिज्य कला अशा विविध क्षेत्रांमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. यामुळे कोडींग, प्रोग्रॅमर यांची नोकरी धोक्यात येईल. परंतु एआय चे टूल विकसित करणारे, एमएल साठी काम करणारे यांना मागणी वाढेल. विद्यार्थी व पालकांनी कॉलेज निवडताना कॅम्पस प्लेसमेंट, इंटर्नशिप याला महत्व दिले पाहिजे त्यासाठी ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्स हा सक्षम पर्याय आहे. डॉ. अमित शेष यांनी सांगितले की, रायगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ आणि पुण्यातील ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्स या संस्थेबरोबर आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग बीएससी (ऑनर्स) या अभिनव पदवी अभ्यासक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या विद्यापीठाच्या वतीने ट्रिपल आयटी, अलाहाबाद या संस्थांबरोबर देखील करार केला आहे. विद्यार्थ्यांना पदवी बरोबर उद्योगात अनुभव मिळावा यासाठी विद्यापीठ समन्वय साधत आहे. या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाने आतापर्यंत ९२ स्टार्टअप सुरू करण्यात आले आहेत. तसेच नॅशनल इंक्युबेशन स्टार्टअप पॉलिसी अंतर्गत या विद्यापीठाने प्रत्येक वर्षासाठी २५ लाख रुपयांचा निधी राखीव ठेवला आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असेही आवाहन डॉ. अमित शेष यांनी केले.

स्वागत, प्रास्ताविक करताना डॉ. संजय गांधी यांनी सांगितले की, पुण्यातील ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्स ही नॅशनल एज्युकेशन पॉलिसी नुसार काम करीत आहे. संस्थेने आतापर्यंत १०० पेक्षा जास्त स्टार्टअप साठी मार्गदर्शन केले आहे."बाटु" बरोबर सुरू होणाऱ्या बारावी नंतर चार वर्षाच्या "आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, बीएससी (ऑनर्स)" हा अभिनव पदवी अभ्यासक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे टेक्नॉलॉजी विभागात सुरू करण्यात आला आहे या मध्ये एआय अधिक कॉन्टम कम्प्युटरचे ज्ञान मिळणार आहे. तसेच चौथ्या वर्षी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा यासाठी उद्योगात इंटर्नशिप देण्यात येईल. या इंटर्नशिप कालावधी मध्ये स्टायपेंट मिळणार असून इंटर्नशिप संपल्यानंतर कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या १२ अधिक ४ वर्षाच्या पदवीचा परदेशात पदवीधर शिक्षणासाठी, उच्च शिक्षणासाठी उपयोग होईल अशी माहिती डॉ. संजय गांधी यांनी सांगितले. सूत्र संचालन समिधा गांधी, आभार अमित गांधी यांनी मानले.

# आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या नियोजनाबाबत महापालिकेत आढावा बैठक संपन्न

पिंपरी (दै. संध्या)



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेत नियोजन व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये तसेच सर्व आवश्यक सुविधा नियोजनबद्ध आणि सुरळीतपणे उपलब्ध करून देण्यासाठी विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

बैठकीत पालखी मार्गावरील वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा, आपत्कालीन सेवा तसेच वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध मूलभूत सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. पालखी मार्गावर येणाऱ्या वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

आषाढी वारी पालखी सोहळा हा राज्याच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा महत्त्वाचा भाग असून लाखो वारकरी या सोहळ्यात सहभागी होत असतात. त्यामुळे पालखी मार्गावरील सर्व यंत्रणांनी आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करून कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

यावेळी पालखी मार्गावरील वाहतूक नियोजन, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक उपाययोजना, स्वच्छता व्यवस्थापन, आरोग्य सेवांची उपलब्धता तसेच विविध विभागांमधील समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पालखी सोहळा सुरक्षित, शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करण्यावर भर देण्यात आला.

आषाढी वारी पालखी सोहळा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका पूर्णपणे सज्ज असून सर्व विभागांच्या समन्वयातून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

**– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी महापालिका सज्ज

आषाढी वारी पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी महानगरपालिकेकडून आवश्यक नियोजन करण्यात येत असून स्वच्छता, आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्थेसह विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून सर्वकष तयारी करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भारतीय जनता पक्षाची बैठक संपन्न

नारायणगाव (दैनिक संध्या) : भारतीय जनता पक्ष जुन्नर पूर्व मंडलाची मानसिक आढावा बैठक आळेफाटा येथे उत्साहात संपन्न झाली. पक्ष संघटना अधिक सक्षम आणि प्रभावी करण्याच्या दृष्टीने बुथ सक्षमीकरण, आगामी संघटनात्मक कार्यक्रमांचे नियोजन ,विविध आघाड्यांच्या कार्याचा आढावा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा अधिकाधिक नागरिकांपर्यंत प्रसार करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांच्या सहभागातून संघटन बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करत आगामी काळात अधिक जोमाने जनसंपर्क आणि जनसेवा उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला. मजबूत संघटन, सक्षम बुथ आणि जनतेचा विश्वास हेच भारतीय जनता पक्षाच्या यशाचे खरे बळ आहे. यावेळी भारतीय जनता पार्टीचे मंडलाध्यक्ष अमोलभाऊ शिंदे, भाजपा मा .जिल्हाउपाध्यक्ष भगवानशेठ घोलप, शहराध्यक्ष विनोदशेठ शेळके ,महिला आघाडीच्या वैशालीताई देवकर, युवा मोर्चाचे जिल्हा पदाधिकारी अजितभाऊ घाडगे, युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष कुणालभाऊ पाटील, सोशल मीडियाचे प्रमुख वैभवजी डावखर, सिद्धार्थ गोपने व प्रमुख सर्व ज्येष्ठ पदाधिकारी युवा सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खरीप पिकांसाठी रुंद सरी-वरंबा(BBF) पद्धतीने पेरणी करण्याचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे अनिश्चित स्वरूप लक्षात घेता शेतकऱ्यांनी पिकांच्या चांगल्या उगवणीसाठी, पाण्याचा कार्यक्षम वापर व उत्पादनवाढीसाठी रुंद सरी-वरंबा (BBF) पद्धतीने पेरणी करावी, असे आवाहन कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. रुंद सरी-वरंबा पद्धतीमध्ये साधारणपणे ९० ते १२० सेमी रुंदीचा वरंबा व १५ ते २० सें. मी. ची सरी तयार करून पेरणी केली जाते. या पद्धतीमुळे अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा जलद गतीने होतो. तसेच पावसात खंड पडल्यास सरींमध्ये साठलेल्या ओलाव्याचा पिकांना फायदा होतो. परिणामी मुळांची वाढ चांगली होऊन खतांचा कार्यक्षम वापर होतो व उत्पादनात वाढ होते. सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, कापूस तसेच इतर खरीप पिकांसाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त मानली जाते. जमिनीतील ओलावा संवर्धन, मृदा धूप नियंत्रण आणि पाणी व्यवस्थापनासाठीही ती प्रभावी ठरते. याशिवाय आंतरमशागत, खत व्यवस्थापन व तण नियंत्रणाची कामे सुलभ होतात. मात्र अतिशय कोरड्या जमिनीत या पद्धतीने पेरणी टाळावी, असा सल्लाही देण्यात आला आहे. बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली रुंद सरी-वरंबा यंत्राचा वापर करून पेरणी करावी. हे यंत्र अनुदानित दरात उपलब्ध असून त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करता येतो. अधिक माहितीसाठी संबंधित मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पिकलेल्या केशर आंब्याची चवच न्यारी

नारायणगाव (दैनिक संध्या) : रमेश खरमाळे यांनी त्यांचे जिवलग मित्र डॉ. अमोल पुंडे यांच्या घरी आज भेट दिली. त्यांच्या शेतातील आंब्याच्या बागेत झाडालाच पिशवी बांधून नैसर्गिकरीत्या पिकवलेला केशर आंबा आज प्रत्यक्ष बागेत जाऊन पाहण्याचा आणि त्याची अप्रतिम चव अनुभवण्याचा योग त्यांना आला. परतीच्या वेळी त्यांनी प्रेमाने भरलेली आंब्याची एक पेटी वानवळा म्हणून दिली ,त्यामुळे त्यांचा हा दिवस आणखी संस्मरणीय ठरला. झाडावरच पूर्णपणे पिकल्यामुळे या केशर आंब्याचा पिवळा धमक रंग , मोहक सुगंध, गोड चव आणि पौष्टिक गुणधर्म मनाला भुरळ घालणारे होते. निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला हा आंबा जसा स्वादिष्ट आहे, तसाच मित्रत्वाच्या नात्यातील आपुलकी आणि जिव्हाळाही अधिक गोड करणारा आहे. हा अविस्मरणीय अनुभव आणि मित्रांनी दिलेले प्रेम सदैव स्मरणात राहील, असे ते म्हणाले.

### श्री रेडेश्वर महाराजांच्या पादुकांचे स्वागत

नारायणगाव (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील बेल्हा येथे अधिकमास आणि एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर श्री रेडेश्वर महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री रेडेश्वर महाराजांच्या पादुका आणि मुखवट्याचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत श्री रेडेश्वर महाराजांच्या पादुका व मुखवटे यांचे मोठ्या भक्तीभावाने स्वागत करण्यात आले. या निमित्ताने गावातून भव्य रथातून पादुकांची मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. गावातील रस्ते फुलांच्या रांगोळ्यांनी सजवले होते. ग्रामस्थांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करत आणि जयघोषात पादुकांचे स्वागत केले. दर महिन्याला एकादशीला पादुकांचे पूजन करण्याची जुनी परंपरा मंदिरात आहे. यावर्षी अधिकमास असल्याने या सोहळ्याचे विशेष आयोजन करण्यात आले होते.त्यानंतर रथाची संपूर्ण गावातून ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. मार्गावरील विविध ठिकाणी भाविकांनी दर्शन घेऊन श्रद्धापूर्वक पूजन केले. पुढे रथ मुक्ताबाई मंदिर येथे मुक्कामासाठी दाखल झाला, त्यानंतर ह .भ. प. विशाल हाडवळे यांचे प्रबोधनपर प्रवचन झाले. ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी आणि अधिकाधिक भाविकांचा सहभाग वाढावा या उद्देशाने दर तीन वर्षांनी अधिक मासात पादुकांची विशेष रथयात्रा आयोजित करण्यात येत असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने प्रसन्ना डोके यांनी दिली. याप्रसंगी प्रवचन, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री उशिरापर्यंत हरिनामाचा जागर आणि पहाटे काकडा आरती करण्यात आली. चहापानानंतर सकाळी रथयात्रा पुढील गावाच्या दिशेने निघाली.या सोहळ्यासाठी बेल्हा आणि परिसरातील शेकडो भाविकांनी गर्दी केली होती. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पाराजी बोरचटे ,जयवंत घोडके, पोपट संभेराव, नाना मुलमुले विश्वनाथ डावखर ,शिवाजी डुंबरे ,शांताराम संभेराव आणि पंचायत समिती सदस्य राजेंद्र पिंगट यांनी मोलाचे सहकार्य केले.

### कडाचीवाडी येथे महेंद्र मेदनकर यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप



चाकण (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडाचीवाडी, ठाकरवाडी येथे शाळा प्रवेशोत्सव २०२६ - २७ दिमाखात साजरा करण्यात आला. नव्याने शाळेत दाखल झालेल्या नवगत विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी, गुलाबपुष्प, पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण खेड पंचायत समितीचे सदस्य महेंद्र मेदनकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रासे केंद्राचे केंद्रप्रमुख संदीप जाधव यांनी सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून शाळेच्या विकासासाठी भरीव निधी जाहीर केला. महेंद्र मेदनकर यावेळी म्हणाले," शाळेच्या विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी उदासीनता टाळली पाहिजे." यावेळी ग्रामविकास अधिकारी निलेश पांडे, उद्योजक हेमंत भुजबळ, पांडुरंग लष्करे, अमोल कड, तुकाराम कड, पोलीस पाटील पुजा घोडके, प्रभाकर कड, विष्णू कोतवाल, अंगणवाडी सेविका दीपाली कांबळे, मदतनीस अनिता कड, शाळेच्या मदतनीस बायडाबाई ठाकर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, विद्यार्थी व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठाकरवाडी शाळेचे मुख्याध्यापक सुजित हासे यांनी सूत्रसंचालन केले. बाळू पारधी यांनी आभार मानले.

# विविध उपक्रम सुरू करण्याचा निर्णय : प्रदीप कासवा

## महात्मा गांधी विद्यालयात 'शाळा प्रवेशोत्सव' अंतर्गत उत्साहात स्वागत



राजगुरुनगर (दै. संध्या)

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर सर्वांगीण विकास करिता संस्थेने विविध उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, शाळेच्या माध्यमातून संस्था एक जबाबदार व सक्षम नागरिक घडवण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे असे खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे संचालक प्रदीप कासवा यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले.

शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचालित महात्मा गांधी विद्यालयात नवीन नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रमाअंतर्गत स्वागत सभारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी नवीन शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या इयत्ता ५ ते १० वीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत मोठ्या उत्साहात पुष्पगुच्छ देऊन ढोल, लेझीम च्या गजरात करण्यात आले. या दरम्यान शाळेच्या प्रांगणात आनंदी व उत्साही वातावरण निर्माण झाले होते. यावेळी नवप्रवेशित विद्यार्थी व पालकांच्या स्वागतासाठी येथील बाफना रंगमंदिर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सभे दरम्यान कासवा मनोगत व्यक्त करताना पुढे म्हणाले खेड तालुका एज्युकेशन सोसायटीने विद्यार्थ्यांसाठी सर्व भौतिक, पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या प्रसंगी

खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे संचालक प्रदीप कासवा, उर्मिला सांडभोर, राहुल कुंभार, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, मुख्याध्यापिका संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव, पर्यवेक्षक सोपान निसरड, हौशीराम मुठे, सुनीता ठाकूर, लतीफ शाह, पालक, विद्यार्थी व अध्यापक वर्ग उपस्थित होता.

तत्पूर्वी नव शैक्षणिक वर्ष निमित्ताने खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचालित महात्मा गांधी विद्यालय,शेठ केसरचंद प्राथमिक विद्यालय, व के. टी. इ.एस इंग्लिश माध्यम या शाळांना आकर्षक फुले,व बलून ने सजावट करून रांगोळी काढण्यात आली होती.

प्रेरणादायी गीतांने प्रारंभ झालेल्या स्वागत सभारंभ वेळी संस्था पदाधिकारी, विद्यालयाचे अधिकारी, अध्यापक यांनी मुलांना पेन व गुलाबपुष्प वाटप करून त्यांचे स्वागत केले.

तसेच प्रतिनिधिक स्वरूपात विद्यालयातील दहा विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठपुस्तके वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका संध्या कांबळे यांनी विद्यार्थी व पालक यांची कर्तव्ये व जबाबदारी यासंदर्भात माहिती दिली. उपमुख्याध्यापिका रेखा जाधव यांनी शालेय उपक्रम, पर्यवेक्षक लतीफ शाह यांनी सहशालेय उपक्रम, पर्यवेक्षक सोपान निसरड यांनी शालेय वेळ व विद्यार्थी शिस्त याबाबत सूचना दिल्या. तुळशीराम घोलप यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षिका सुनीता ठाकूर यांनी आभार मानले.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी आकर्षक सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला होता.



## वसतिगृह विद्यालय कान्हाटी येथे कीटक जन्य आजारा बाबत जनजागृती

कान्हाटी (दै. संध्या)

ता.बारामती येथील कृषि उद्योग मुल शिक्षण संस्थेच्या वस्तीगृह विदयालयात पावसाळ्या च्या पाश्वाभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये जलजन्य व कीटकजन्य आजारा बाबत जनजागृती व्हावी या साठी मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी कीटक जन्य आजारा बाबत लक्षणें घ्यावायची काळजी या बाबत सहाय्यक जिल्हा हिवताप अधिकारी अर्चना संकपाळ यांनी मार्गदर्शन केले तसेच या आजारा पासून प्रतिबंधात्मक उपाय योजना बाबत तालुका हिवताप पर्यवेक्षक एस एस सावरकर यांनी माहिती दिली. तसेच गप्पी मासे त्याचा उपयोग या बाबत आरोग्य निरीक्षक मा गायकवाड यांनी माहिती दिली या वेळी अर्चना संकपाळ ,मुख्याध्यापक अनिता कदम , एस एस सावरकर , हिवताप पर्यवेक्षक मा एस एन इनामदार कीटक संहारक पुणे आरोग्य निरीक्षक गायकवाड डॉ. कीर्ती पिसाळ , आरोग्य सेवक एस बालगूडे, एच डी कौले , जे ए इनामदार आशा , शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## बेपत्ता महिला व तीन मुले सुखरूप

नारायणगाव (दै. संध्या)



ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तीन लहान मुलांसह बेपत्ता झालेल्या आदिवासी महिलेचा शोध घेण्यात ओतूर पोलिसांना अवघ्या दोन दिवसांत यश आले आहे. महिला आणि तिची तीनही मुले सुखरूप मिळाल्याने कुटुंबीयांनी तसेच पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. पोलिसांनी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून महिला व मुलांना त्यांच्या पती आणि नातेवाईकांच्या स्वाधीन केले. पोलिसांच्या तत्परतेमुळे महिला आणि तिची मुले सुखरूप मिळाल्याने परिसरातून ओतूर पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कांता राजकिरण केदार वय ३३वर्षे, रा. टोकाकडे, ता. मुरबाड, जि. ठाणे या आपल्या तीन मुलांसह सासरच्या गावी बस्ती सावरगाव ता. जुन्नर येथे जाण्यासाठी निघाल्या होत्या. माहेरच्या नातेवाईकांनी त्यांना बसमध्ये बसवून दिले होते. त्या बनकर फाटा येथे उतरल्या. दरम्यान, त्यांचे पती त्यांना घेण्यासाठी सायंकाळी बनकर फाटा येथे आले होते. मात्र, महिलेकडे मोबाईल फोन नसल्याने दोघांची भेट होऊ शकली नाही. बराच वेळ प्रतीक्षा करूनही संपर्क न झाल्याने संबंधित महिलेने पुन्हा कल्याणकडे जाणारी बस पकडली आणि मुरबाड तालुक्यातील टोकावडे येथील आपल्या मामाच्या गावी निघून गेल्या. त्या सासरी न पोहोचल्याने कुटुंबीयांनी चिंतेतून १२ जून २०२६ रोजी ओतूर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती.

तक्रार दाखल होताच ओतूर पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम हाती घेतली. बनकर फाटा, ओतूर, जुन्नर परिसर तसेच पारगाव मढ, कल्याण आणि मुरबाड भागातील नातेवाईकांकडे चौकशी करण्यात आली. दोन दिवसांच्या शोधानंतर संबंधित महिला टोकाकडेजवळील एका वस्तीवर आपल्या मुलांसह सुखरूप आढळून आली.

ही शोधमोहीम पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभमकुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, महिला पोलीस हवालदार मोहिनी जाधव, रेश्मा फापाळे तसेच महिला पोलीस शिपाई खोसे यांच्या पथकाने ही कामगिरी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'अंतर्गत सामंजस्य करार

बारामती (दै. संध्या)




बारामती येथील तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या आज दि. १५/०६/२०२६रोजी क्विकहिल फाउंडेशनसोबत 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. या कराराच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत सखोल जागरूकता निर्माण करणे तसेच समाजातील विविध घटकांमध्ये जनजागृती करणे हा आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांमार्फत शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शन, प्रात्यक्षिके आणि जनजागृती अभियान राबविण्यात येतआहे.या सामंजस्य करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप आणि श्री. अजय शिर्के , क्विकहिल फाउंडेशन यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सदर उपक्रम हे काळाची गरज आहे तसेच उपक्रमासाठी सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमांतर्गत 'कमवा आणि शिका' या तत्त्वावर विद्यार्थ्यांना कार्य करताना आर्थिक सहाय्य देखील दिले जाणार आहे. तसेच, या कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे, सायबर जागरूकता मोहिमा आणि प्रात्यक्षिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळत असून, त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि सामाजिक बांधिलकी विकसित होत आहे. या सामंज्यस्य करारासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप,उपप्राचार्य, अधिष्ठाता, उपक्रम समन्वयक प्रा. सलमा शेख यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. अनुपमा काटकर, सहयोगी संचालक अजय शिर्के, कार्यसंघ सदस्य गायत्री केसकर आणि दिपू सिंग यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

## गुरुवर्य विद्यावत्सल यांच्यासाठी गुरुवारी अभिवादन बैठक



चाकण(दै. संध्या)

अखिल भारतीय विद्यार्थी सेनेचे संस्थापक - अध्यक्ष, गुरुवर्य विद्यावत्सल यांच्या जयंतीनिमित्त चाकण येथे गुरुवारी (दि.१८) अभिवादन बैठक आयोजित करण्यात आली आहे. येथील श्रीराम सोसायटीतील विद्यावत्सल अभ्यासिका, ग्रंथालयात गुरुवारी सकाळी साडेआठ वाजता ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत गुरुवर्य विद्यावत्सल यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष एड. किरण झिंजुरके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. चाकण पंचक्रोशीतील सर्व किल्लेदारांनी या प्रतिमा पूजनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन एड. किशोर झिंजुरके, राहुल वाडेकर व राजेंद्र दीक्षित आदींनी केले आहे.

## पशुपालक आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या शासन निर्णयांची अंमलबजावणी रखडली



कोरेगावमुळ (दै. संध्या)

पशुसंवर्धन विभागामार्फत मागील काही वर्षांत पशुपालक आणि कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितासाठी मंजूर करण्यात आलेल्या विविध शासन निर्णयांची (GR) तालुका व गाव पातळीवर अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. या उदासीनतेमुळे राज्यातील लाखो पशुपालक आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, प्रशासनाविरोधात मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा 'महाराष्ट्र राज्य पोल्ट्री योद्धा संघटना' आणि 'महाराष्ट्र राज्य शासन पशुसंवर्धन समन्वय समिती'ने दिला आहे. या संदर्भात संघटनेचे पदाधिकारी नंदकुमार चौधरी (उपाध्यक्ष) आणि शरद बाळासाहेब गोडांबे (कार्याध्यक्ष) यांनी महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन आयुक्त किरण पाटील यांना लेखी पत्र देऊन आपल्या मागण्या मांडल्या आहेत. पशुखाद्य विक्री करणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या खाद्याच्या गोणीवर अन्न घटकांची ठळक नोंद करणे आणि शेतकऱ्यांसोबत एकतर्फी करार न करता तो रजिस्टर करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, या नियमाची कोणतीही अंमलबजावणी आजतागायत झालेली नाही. या पत्रात पशुखाद्य कायद्या संदर्भात देखील सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच, राज्यात वारंवार आयुक्तांच्या बदल्या केल्या जातात, त्या थांबवल्या जाव्यात अशी विनंती राज्य सरकारला करण्यात आली आहे. अनेक पशुखाद्य कंपन्यांची अद्याप नोंदणी झालेली नाही, ती जिल्हावार जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## न्यू इंग्लिश स्कूल अष्टापूर विद्यालय : विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

कोरेगावमुळ (दै. संध्या)



आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदर संचलित, हवेली तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल अष्टापूर विद्यालयामध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी 'प्रवेश उत्सव' मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. तब्बल दीड महिन्यांच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर शाळेची पहिली घंटा वाजताच विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने अवघे शालेय प्रांगण दुमदुमून गेले होते. पहिल्याच दिवशी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण शाळा प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. याप्रसंगी अष्टापूर गावचे प्रसिद्ध उद्योगपती राजेश सुदाम कोतवाल यांनी विद्यालयाला 'कॅनोन' कंपनीची झेरॉक्स मशीन सप्रेम भेट दिली. त्यांच्या या दानशूरपणाबद्दल उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. याच कार्यक्रमात शाळेची माजी विद्यार्थिनी अनुष्का निकाळजे हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल शाल, श्रीफळ आणि गुलाबपुष्प देऊन तिचा गौरव करण्यात आला. विद्यालयामध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या इयत्ता पाचवीच्या आणि सर्वच विद्यार्थ्यांसाठी हा दिवस विशेष संस्मरणीय ठरला. मुख्य कार्यक्रमात शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना नवीन कोरी पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन पुस्तकांचा सुवास आणि हातात आलेली नवी कोरी पुस्तके पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. पहिल्या दिवशी अभ्यासाचे ओझे न देता विद्यार्थ्यांसाठी मनोरंजक खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दुपारच्या भोजनात विद्यार्थ्यांना विशेष गोड खाऊ म्हणून 'बालुशाही' देण्यात आली. विद्यालयाचे स्कूल कमिटीचे अध्यक्ष श्रीहरी कोतवाल यांनी अध्यक्षीय मनोगतामधून सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. 'विद्यार्थ्यांनी वर्षभर आपल्या अभ्यासातून आणि आदर्श कृतीतून गावाचे व शाळेचे नाव उंच करावे. अभ्यास सांभाळून विविध प्रकारच्या क्युरिक्युलर व शैक्षणिक स्पर्धांमध्ये हिरीरीने सहभागी व्हावे,' असे आवाहन त्यांनी यावेळी केले. आपल्या प्रास्ताविकात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका दिपाली दळवी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करुन नियमित शाळेत येण्याचे व उत्तम दर्जाचे शिक्षण घेण्याचे आवाहन केले. 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा नेहमीच कटिबद्ध राहील,' असा विश्वास त्यांनी पालकांना दिला. या कार्यक्रमासाठी आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदरचे नियामक मंडळाचे सदस्य रमेश कोतवाल, संस्था व शाळा समन्वयक माजी मुख्याध्यापक सुभाष काळे, शालेय समितीचे सदस्य तयाजी जगताप, सोसायटीचे चेअरमन नितीन मेमाणे, विजय कोतवाल, भैरवनाथ प्रसादिक दिंडीचे माजी अध्यक्ष शामराव वारे, अष्टापुर वि.का. सोसायटीचे माजी व्हाईस चेअरमन सुरेशराव कोतवाल , माजी उपसरपंच सुभाष बारीकराव कोतवाल, शाळा सल्लागार समितीचे सदस्य दिवाकर पिंगळे, माजी विद्यार्थी संघाचे सदस्य राहुल शामराव कोतवाल, चंद्रकांत कोतवाल, पालक संघाचे अध्यक्ष राहुल पंढरीनाथ कोतवाल, केतन कोतवाल, मकरंद कोतवाल, सचिन कोतवाल, रमेश आबासो कोतवाल, नाना प्रकाश कोतवाल, महेश कोतवाल, पंचशील प्रतिष्ठानचे अध्यक्ष केतन निकाळजे यांच्यासह अनेक मान्यवर ग्रामस्थ, पालक आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्याच दिवशी मिळालेल्या या जंगी स्वागतामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दलची ओढ आणि नवा उत्साह पाहायला मिळाला. सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब ढवळे यांनी केले, तर सहशिक्षक चौरंगनाथ कामथे यांनी उपस्थितांचे आभार मानले.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### राज्यपालांचे महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन येथे पुष्पांजली वाहून अभिवादन केले. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे तसेच लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी व पोलीस दलातील अधिकारी व जवान यावेळी उपस्थित होते.



### महाराणा प्रतापसिंह यांना जयंतीनिमित्त अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सामान्य प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी निलेश हरड, सहायक कक्ष अधिकारी अमोल चव्हाण, विजय शिंदे यांच्यासह मंत्रालयातील विविध अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून यावेळी अभिवादन केले.

### अन्न, नागरी पुरवठा विभागाची धडक कारवाई

मुंबई (दैनिक संध्या) : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दक्षता पथकाने वडाळा येथे धडक कारवाई करत पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधन (एटीएफ) चोरीच्या रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत सुमारे १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एका व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले असून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अन्न, नागरी पुरवठा विभागाचे नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १६ जून २०२६ रोजी दक्षता पथकाने वडाळा परिसरात छापा टाकला. कारवाईदरम्यान दोन इंधन टँकरचे सील तोडून त्यातील इंधन प्लास्टिक कॅनमध्ये भरून चोरी केली जात असल्याचे आढळून आले. दक्षता पथकाने घटनास्थळी एका व्यक्तीस रंगेहाथ पकडले. तपासात २० लीटर क्षमतेच्या प्लास्टिक कॅनमध्ये प्लास्टिक पाईप व व्हॉल्वच्या साहाय्याने इंधन काढले जात असल्याचे उघड झाले. पथकाने तपासणी केलेल्या एमएच-०४ केयू-१८२६ या टँकरमध्ये १० हजार लीटर पेट्रोल आणि १४ हजार लीटर डिझेल, तर एमएच-०४ एलवाय-६३८८ या टँकरमध्ये २९ हजार लीटर विमान इंधन (एटीएफ) असल्याचे आढळून आले.

### हाफकिन संस्था आणि चक्र यांच्यात सामंजस्य करार

मुंबई (दैनिक संध्या) : हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था आणि महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधे विभागांतर्गत कार्यरत सेंटर फॉर हेल्थ, अप्लाइड नॉलेज अँड रिसर्च ऑटोनॉमी (चक्र) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. १८९९ मध्ये स्थापन झालेली हाफकिन संस्था ही देशातील सर्वात जुन्या जैववैद्यकीय संशोधन संस्थांपैकी एक असून संसर्गजन्य रोगांवरील संशोधन, प्रशिक्षण आणि चाचणी क्षेत्रात अग्रणी भूमिका बजावत आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत प्राध्यापक विकास, क्लिनिकल ट्रायल्स, जैववैद्यकीय संशोधन, ट्रान्सलेशनल मेडिसिन, जीनोमिक्स, सार्वजनिक आरोग्य तसेच क्षमता विकास या क्षेत्रांमध्ये दोन्ही संस्था संयुक्तपणे कार्य करणार आहेत.

## मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाच्या विकासकामांना वेग देण्यावर भर : मंत्री नितेश राणे

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाशी संबंधित विविध प्रकल्प, धोरणे आणि पायाभूत सुविधांच्या कामांचा आढावा मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात आयोजित बैठकीत घेण्यात आला. बैठकीत शिवनीबांध मत्स्य बीज केंद्र भाडेपट्टीने देण्याचा प्रस्ताव, मोर्शी (जि. अमरावती) येथील मत्स्यव्यवसाय व जलशेती पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत प्रस्तावित प्रकल्प, उजनी धरणात मत्स्यबीज सोडण्यासाठी प्लुटस सर्व्हिसेस या ठेकेदारास मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव तसेच शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र, धोम (ता. वाई, जि. सातारा) हे व्हीआरपी फिशरी प्रायव्हेट लिमिटेड यांना भाडेतत्त्वावर चालविण्यास देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

शाश्वत विकास ध्येये अंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित निर्देशकांमध्ये सुधारणा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, ससून डॉक सामंजस्य करारानंतरची कार्यवाही, मरोळ मच्छिमार मार्केट विकासाचा प्रगती अहवाल तसेच मच्छिमार महिलांसाठी हँडग्लोज व गमबूट उपलब्ध करून देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

महाराष्ट्र सागरी मंडळ (जाहिरातींच्या प्रदर्शनाचे विनियमन) विनियम, २०२६ तसेच स्टॉल व जमीन भाडेपट्ट्याने देण्यासंबंधीच्या विनियमांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करण्यात आली. मुंबई वॉटर मेट्रोसाठी पीएमसी नियुक्तीची सद्यस्थिती, वर्सोवा जेट्टीच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशातील इतर प्रवासी जेट्टींवरील सुविधा सुधारणा, विजयदुर्ग व जयगड येथे प्रस्तावित शिपयार्ड प्रकल्प, मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासी जलवाहतुकीसाठी ऑनलाइन तिकीट वितरण प्रणाली तसेच 'लँड मॅनेजमेंट अँड वॉटरफ्रंट यूज पॉलिसी' याबाबतही सविस्तर चर्चा झाली.

मंत्री नितेश राणे यांनी सर्व विषयांचा सविस्तर आढावा घेत कामांची सद्यस्थिती तपासली. प्रलंबित कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने करण्यात यावी तसेच विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक वेग देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप,महाराष्ट्र मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यातील आरसीएफ कंपनीच्या मरीन आउटफॉल लाईनमुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी मंत्रालयात घेतला. यावेळी आवश्यक चॅनेल व संरक्षण बंधारा उभारणी तसेच थळ-नवगाव परिसरातील मच्छीमार बांधवांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित कामे लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करावे : फुंडकर



■ मुंबई (दै. संध्या)

बदलत्या औद्योगिक आणि आर्थिक परिस्थितीत नवीन कामगार संहितांची प्रभावी अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. त्यासाठी सक्षम, प्रशिक्षित आणि अभ्यासू अधिकारी वर्ग तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रशिक्षणातून सहभागी अधिकारी हे केवळ प्रशिक्षणार्थी न राहता 'मास्टर ट्रेनर' म्हणून उदयास यावेत आणि कामगार विभागातील इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत नवीन कामगार कायद्यांचे ज्ञान पोहोचवावे, असे प्रतिपादन कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले आहे.

परळ येथील ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या वतीने आयोजित 'नवीन कामगार संहिता आणि कामगार कायद्यातील बदल' या विषयावरील चार दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मंत्री ॲड. फुंडकर बोलत होते. प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना संबोधित करताना मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, कामगार विभाग हा शासन आणि समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. कामगारांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षा आणि उद्योगांच्या प्रगतीसाठी विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या जबाबदाऱ्या संवेदनशीलतेने आणि कार्यक्षमतेने पार पाडाव्यात. नवीन कामगार संहितांबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांचा लाभ कामगार आणि उद्योग या दोन्ही घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

संस्थेच्या संचालक रोशनी कदम – पाटील यांनी आपल्या मनोगतात प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट करुन अधिकारी वर्गाची भूमिका विषद केली. राज्यातील विविध विभागांतून आलेले कामगार विभागाचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी तसेच संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. नवीन कामगार संहितांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित अधिकारी वर्ग हीच खरी ताकद असल्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला. प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या वतीने करण्यात आले.

## होलार समाजाच्या अभ्यासासाठी समिती गठीत करणार – मंत्री संजय शिरसाट

■ मुंबई (दै. संध्या)

होलार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल. या समितीच्या अहवालाच्या आधारे समाजाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील, असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली होलार समाजाच्या विविध प्रश्नाबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, दूरदृश्य प्रणालीद्वारे समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ – मुंडे, होलार समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, होलार समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी 'संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ' अंतर्गत होलार समाज आर्थिक विकास महामंडळ या स्वतंत्र उपकंपनीची स्थापना करण्यात आली आहे. यासाठी निधीची तरतूदही करण्यात आली आहे. समाजासाठी शासनाच्या विविध योजना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचाव्यात यासाठी विशेष परिपत्रक जारी करण्यात येणार आहे. हे परिपत्रक राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयांना पाठविण्यात येणार असून त्याद्वारे संबंधित योजनांची माहिती समाजबांधवांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात येईल. मंत्री शिरसाट म्हणाले की, होलार समाजाच्या विविध मागण्या आणि प्रश्नांना न्याय देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. समाज प्रतिनिधींसोबत सातत्याने संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या जात आहेत.



## रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेण्यासाठी विधि व न्याय विभागाचे मार्गदर्शन घ्यावे – आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके

■ मुंबई (दै. संध्या)

आदिवासी विकास विभागांतर्गत आश्रमशाळांमध्ये तासिका/रोजंदारी तत्त्वावर कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यासंदर्भात विविध न्यायालयीन प्रकरणे, न्यायालयाचे वेगवेगळे आदेश आदींचा अभ्यास करून विधि व न्याय विभागाचे कायदेशीर मार्गदर्शन प्राधान्याने घेण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.

मंत्री डॉ. वुईके यांनी याविषयासंदर्भात शासकीय निवासस्थानी बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. आदिवासी विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते. कर्मचारी प्रतिनिधीच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत तासिका व रोजंदारी तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्यासंदर्भातील न्यायालयीन आदेश, शासन निर्णय आणि विविध प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये तासिका व रोजंदारी तत्त्वावर कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी अनेक वर्षांपासून प्रतिकूल परिस्थितीत आणि प्रतिकूल ठिकाणी सेवा देत आहेत. त्यांच्या मागण्या एवढ्या वर्षांपासून प्रलंबित ठेवणे संयुक्तिक नसून, याकडे सहानुभूतीपूर्वक पाहण्याची गरज आहे. हे प्रकरण आणखी प्रलंबित न ठेवता, त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत विधि व न्याय विभागाचे कायदेशीर मार्गदर्शन घेऊन हा मुद्दा निकाली काढावा. मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठांमध्ये कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी विविध रिट याचिका दाखल केल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने १० वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाला निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात शासनाने यापूर्वीही विशेष बाब म्हणून पात्र कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाबाबत निर्णय घेतला आहे. बैठकीत न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांवर सर्व प्रकरणांचा कायदेशीर आणि मानवीय दृष्टीकोनातून विचार करावा. न्यायालयीन आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करताना पात्र कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, तसेच शासनाच्या नियमांचेही पालन व्हावे, याची खबरदारी बाळगण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, आदिवासी भागातील शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता टिकवून ठेवणे आणि दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. न्यायालयीन आदेशांचे पालन करताना कोणत्याही पात्र कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. सर्व प्रकरणे निर्धारित कालावधीत निकाली काढण्यासाठी विभागीय अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे.

## हाळगाव येथील शासकीय कृषी महाविद्यालयास पाणी पुरवठ्यासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करा




■ मुंबई (दै. संध्या)

**विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषी महाविद्यालय, हाळगाव (ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) येथे नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी करमाळा तालुक्यातील मांगी मध्यम प्रकल्पातून उपसा जलसिंचन योजनेद्वारे पाणी देण्याचा २६.९१ कोटी रुपयांचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करावा, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

विधान भवन, मुंबई येथे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली या महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांविषयक बैठक झाली. बैठकीस कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी सचिव परिमल सिंह यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते; तर अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

सभापती प्रा. शिंदे म्हणाले की, हाळगाव येथील कृषी महाविद्यालयापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेल्या मांगी मध्यम प्रकल्पातून पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उपसा जलसिंचन योजना राबविण्याचा प्रस्ताव विद्यापीठाने कार्य परिषदेची मान्यता देऊन तो शासनास तातडीने सादर करावा. त्याच बरोबर महाविद्यालयातील विश्रामगृहाचे नूतनीकरण, अंतर्गत रस्त्यांची उभारणी, खेळाचे मैदान, गोदाम तसेच इतर पायाभूत सुविधांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेऊन विविध विभागांमध्ये समन्वय साधावा. बैठकीत महाविद्यालय परिसरात विविध शेड्स, पाइपलाइन व कुंपण उभारणीसह पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भातही सविस्तर चर्चा झाली. महाविद्यालय सुरू होऊन आठ वर्षे उलटूनही भूसंपादन प्रक्रिया व अन्य काही कामे अपूर्ण असल्याबद्दल प्रा. शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठीकृषी, सार्वजनिक बांधकाम, महसूल आणि जलसंपदा विभागांनी परस्पर समन्वय राखून त्यांची जबाबदारी चोख पार पाडावी, असेही ते म्हणाले. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाविद्यालयाशी संबंधित सर्व प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावेत. हे प्रस्ताव प्राप्त होताच शासनस्तरावरून त्यांना बिनाविलंब मान्यता देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.



## अतिरिक्त प्लाझ्माचा प्रभावी वापर करून जीवनावश्यक औषधनिर्मितीचा प्रस्ताव तयार करा

### वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील रुग्णांना जीवनावश्यक औषधे व उपचार अधिक सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त उपलब्ध प्लाझ्माचा प्रभावी वापर करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात वैद्यकीय शिक्षण विभागाच्या विषयांवरील आढावा बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत राज्यातील रक्तपेढ्यांमधील अतिरिक्त प्लाझ्माच्या वापराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यात सध्या सुमारे ४५० रक्तपेढ्या कार्यरत असून त्यापैकी ७९ शासकीय क्षेत्रातील आहेत. उर्वरित रक्तपेढ्या खासगी व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जातात. शासकीय क्षेत्रात सुमारे २५ हजार लिटर अतिरिक्त प्लाझ्मा उपलब्ध असून खासगी क्षेत्रात हे प्रमाण तीन लाख लिटरपेक्षा अधिक असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या अतिरिक्त प्लाझ्माचा उपयोग करून हिमोफिलिया, थॅलेसेमिया तसेच इतर गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आवश्यक औषधनिर्मितीची क्षमता विकसित करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव तयार करून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना मुश्रीफ यांनी दिल्या. याशिवाय वैद्यकीय शिक्षण विभागाच्या विविध योजनांचा आढावा, समित्यांच्या कार्यपद्धतीतील सुधारणा, आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या आयोजनाची तयारी, गोंदिया येथील प्रकल्पांची प्रगती, वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांतील मनुष्यबळाची उपलब्धता, दंत महाविद्यालय व सभागृह उद्घाटन कार्यक्रमांचे नियोजन तसेच विविध वैद्यकीय संस्थांमधील पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भातील विषयांवरही चर्चा करण्यात आली. बैठकीत मांडण्यात आलेल्या विविध प्रस्तावांवर सकारात्मक दृष्टीकोनातून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री मुश्रीफ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकणला उन्हाळी सुट्टीनंतर दीड महिन्यांनी वाजली शाळेची घंटा

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल व स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज चाकण येथे शैक्षणिक वर्ष सन २०२६ - २७ च्या नवगत विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. उन्हाळी सुट्टीनंतर दीड महिन्यांनी चाकण भागातील शाळांमध्ये घंटा वाजली असून, नवगत विद्यार्थ्यांमुळे शाळा गजबजुन गेल्या आहेत. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा सुरेशभाऊ गोरे व संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मार्गदर्शक मनोहर शेवकरी यांनी यावेळी प्रशालेतील विद्यार्थी, शिक्षक वृंद यांचे कौतुक केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी गुलाबपुष्प, शैक्षणिक साहित्य, पुस्तकं देऊन मुलांचे औक्षण करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्या माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, पर्यवेक्षक सविता कुमकर, ज्योती अनाप, प्रेरणा काळे, विभाग प्रमुख सुवर्णा चौधरी, गणेश काळे, लीना चौधरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते. नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी यावेळी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्या माधुरी गोरे यांनी सर्वांचे आभार मानले.



### शिक्षण संचालक कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची जिजामाता विद्यालयाला भेट

जेजुरी (दैनिक संध्या) : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्याच दिवशी जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी येथे महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक कार्यालय, पुणे येथील अधिकारी दिपक पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाची सविस्तर माहिती घेतली. शालेय पोषण आहार योजना, मोफत पाठ्यपुस्तक वाटप, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक वातावरण तसेच गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला. विद्यालयाचे प्राचार्य तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी दिपक पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला. यावेळी दिपक पाटील यांनी विद्यालयातील उपक्रमांबाबत समाधान व्यक्त केले. नव्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी अधिक प्रभावीपणे कार्य करावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन पर्यवेक्षिका लीना पायगुडे व बाळासाहेब जगताप,सोमनाथ उबाळे,सोनबा दुर्गाडे,राजाराम पिसाळ, राघू हारुळे,कैलास सोनवणे यांनी केले.

### पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेचा मूळ मार्ग कायम ठेवा : दिलीप पाटील यांची मागणी

मंचर (दैनिक संध्या) : खोडद (ता. जुन्नर) येथील 'जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप' (जीएमआरटी) या जागतिक स्तरावरील संशोधन प्रकल्पाचे महत्त्व अबाधित राखून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी शक्य असल्याने तज्ज्ञांच्या मतांचा विचार करून चाकण-खेड-आंबेगाव-जुन्नर-संगमनेर-नाशिक हा मूळ रेल्वे मार्ग कायम ठेवावा, अशी मागणी राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. रांजणगाव येथे बुधवारी (ता. १७) वैष्णव यांची भेट घेऊन वळसे पाटील यांनी संशोधन तज्ज्ञांचा अहवाल आणि तांत्रिक अभ्यास टिपण सादर केले. भाभा अणुसंशोधन केंद्र (BARC), टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR) आणि संरक्षण संशोधन व विकास संस्था (DRDO) यांच्याशी संबंधित राहिलेले माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. मोहन फडणीस यांनी तयार केलेल्या अभ्यासाचा त्यामध्ये समावेश आहे.

# शाळा भरली : पिंपरे खुर्दमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

## गावातून मिरवणूक, औक्षण, पाऊलखुणा अन् सेल्फी पॉइंटमुळे पहिलाच दिवस ठरला संस्मरणीय

नीरा (दै. संध्या)

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी पिंपरे खुर्द (ता. पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे अनोख्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गावातून काढण्यात आलेली मिरवणूक, औक्षण, पाऊलखुणा, खाऊ वाटप आणि आकर्षक सेल्फी पॉइंटमुळे विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिलाच दिवस आनंदोत्सवात साजरा झाला.



सोमवारपासून शाळा सुरू होताच पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी गावातील ग्रामस्थ, पालक आणि लोकप्रतिनिधींनी विशेष पुढाकार घेतला. पंचायत समिती सदस्य मोनिका कांबळे आणि सरपंच राजेंद्र गायकवाड यांच्या उपस्थितीत नवागत विद्यार्थ्यांची गावातून उत्साहपूर्ण मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि आनंदी वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

शाळेत आगमनानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या पाऊलखुणा कागदावर उमटवून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची प्रतीकात्मक सुरुवात करण्यात आली. या भावनिक आणि प्रेरणादायी क्षणाला पालकांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

यावेळी सरपंच राजेंद्र गायकवाड यांच्या माध्यमातून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच उभारण्यात आलेल्या आकर्षक सेल्फी पॉइंटने विद्यार्थी आणि पालकांचा आनंद द्विगुणित केला. अनेकांनी या अविस्मरणीय क्षणांचे छायाचित्रांद्वारे जतन केले.

कार्यक्रमास सरपंच राजेंद्र थोपटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहिदास थोपटे, मुख्याध्यापिका विशाखा मेमाणे, ग्रामसेविका योजना चव्हाण, पोलिस पाटील संघाचे उपाध्यक्ष राहुल शिंदे, माजी उपसरपंच भरत निगडे, पोलिस पाटील रूपाली सोनवणे, साहेबराव शिंदे, बाबा दगडे, राजेंद्र पटणे, सचिन यादव, संभाजी गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, शाहरुख मुलाणी, दत्तात्रय जाधव यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.


पिंपरे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही तालुक्यातील आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. पहिली ते सातवीपर्यंत शिक्षणाची सुविधा असलेल्या या शाळेला आदर्श शाळेचा दर्जा मिळवून देण्यात माजी मुख्याध्यापक महादेव माळवतकर गुरुजी यांचे मोठे योगदान आहे. विशेष म्हणजे सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी विद्यार्थ्यांच्या स्वागत सोहळ्यास उपस्थित राहून शाळेप्रती असलेली आपुलकी जपली.

नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आकर्षण निर्माण झाले असून, संपूर्ण गावाने शाळेला दिलेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद कौतुकास्पद ठरला आहे.

## सायलेन्सर काढून दहशत : कर्कश आवाजात भरधाव फेऱ्या; नागरिक हैराण

उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन (ता. हवेली) परिसरात सायलेन्सर काढलेल्या मोटरसायकलींचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या शांततेला तडा जात आहे. सोमवार (दि. १५ जून) रोजी सकाळी सुमारे सव्वा दहा वाजण्याच्या दरम्यान बगाडे वस्ती रोड परिसरात हिरो होंडा कंपनीची सीडी डॉन मोटरसायकल सायलेन्सर काढून कर्कश आवाज करत भरधाव वेगाने वारंवार फेऱ्या मारत असल्याचा प्रकार समोर आला आहे. तसेच हीच मोटारसायकल रविवारी सायंकाळी आठ वाजण्याच्या दरम्यान उरुळी कांचन बाजारपेठ रोडनी व परिसरात चकरा मारत असल्याचे नागरिकांनी सांगितले. तसेच नुकतीच शाळा व कॉलेज चालू झाले आहेत. मोठ्या आवाजाने विद्यार्थ्यांच्या मनात व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण



झाले आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मोटरसायकलवर दोन तरुण बसले होते. त्यांनी मुद्दाम सायलेन्सरचा मोठा आवाज काढत परिसरात अनेक चकरा मारल्या. या प्रकारामुळे रस्त्यावरील नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागला. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, गेल्या दोन दिवसांपासून हीच मोटरसायकल उरुळी कांचन परिसरात कर्कश आवाज करत फिरत असून भरधाव वेगामुळे अपघाताचा धोका देखील निर्माण होत आहे. वाहनचालकांच्या या बेफिकीर वर्तनामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

सायलेन्सरमध्ये बेकायदेशीर बदल करून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिसरात वाढत चाललेल्या अशा प्रकारांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि शांततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

> तुपे वस्ती रोड परिसरात अनेक दिवसांपासून काही युवक बुलेट, यामाहा, स्प्लेंडर तसेच इतर दुचाकींचे सायलेन्सर बदलून किंवा काढून मोठा कर्कश आवाज करत भरधाव वेगाने फेऱ्या मारत आहेत. दिवसभर तसेच सायंकाळच्या वेळेत या वाहनांचा त्रास अधिक जाणवतो. या आवाजामुळे परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या या प्रकारामुळे शांतता भंग होत आहे. संबंधित वाहनचालकांवर पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करून नागरिकांना या त्रासातून दिलासा द्यावा, अशी आमची मागणी आहे.
>
> **– विपुल घोडके, स्थानिक नागरिक, उरुळी कांचन.**

## दौंड कॉर्ड लाइन स्थानकावर पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेसचे जल्लोषात स्वागत

दौंड (दै. संध्या)

पुणे - साईनगर शिर्डी एक्सप्रेसचे दौंड कॉर्ड लाइन रेल्वे स्थानकावर स्वागत करण्यात आले. दौंड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा दुर्गादेवी जगदाळे यांनी या एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखविला. पुणे जिल्ह्यातील सोनवडी ( ता. दौंड) येथील रेल्वे उड्डाण पुलाखालील दौंड कॉर्ड लाइन रेल्वे स्थानकावर पुणे - साईनगर शिर्डी एक्सप्रेसचे स्वागत करण्यात आले. पुणे रेल्वे स्थानक येथे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवून या रेल्वे सेवेचा शुभारंभ केला होता. त्यानंतर दौंड कॉर्ड लाइन रेल्वे स्थानकावर नगराध्यक्षा दुर्गादेवी जगदाळे, उपनगराध्यक्ष छाया थोरात, नगरपालिकेचे आजी - माजी पदाधिकार्यांनी एक्सप्रेसचे स्वागत केले. एक्सप्रेसला दुर्गादेवी जगदाळे यांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर एक्सप्रेस अहिल्यानगरच्या दिशेने रवाना झाली. रेल्वेचे वरिष्ठ विभागीय अभियंता प्रशांत पाटील, वाणिज्य विभागाच्या अधिकारी सुधा राणी, स्टेशन मास्तर संदीपकुमार सिंग यांच्यासह दौंड लोहमार्ग पोलिस व रेल्वे सुरक्षा दलाचे अधिकारी आणि अंमलदार या वेळी उपस्थित होते. दररोज धावणारी पुणे - साईनगर शिर्डी एक्सप्रेस पुण्याहून सकाळी ६ वाजून ५५ मिनिटांनी सुटून दौंड कॉर्ड लाइन स्थानकावर सकाळी ७ वाजून ५३ मिनिटांनी दाखल होऊन ७ वाजून ५५ मिनिटांनी अहिल्यानगरच्या दिशेने रवाना होईल. दौंड कॉर्ड लाइन स्थानकावरून रवाना झाल्यानंतर श्रीगोंदा रोड - अहिल्यानगर - राहुरी व बेलापूर स्थानकांवर थांबा घेत साईनगर येथे दुपारी १२ वाजता ही एक्सप्रेस दाखल होईल.

## पुलावरून पाण्यात कोसळून तरुण दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

घोडेगाव (दै. संध्या)

घोडेगाव ते भीमाशंकर रस्त्यावरील शिनोली (ता आंबेगाव) गावच्या हद्दीत नेवाळवाडी फाट्याजवळ (बुधवार, दि. १७) सकाळी 10 च्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी पुलाच्या सिमेंटच्या कठड्याला जोरात धडकली. या अपघातात दुचाकीचालक तरुण पुलावरून थेट खाली पाण्यात कोसळल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. रुपेश रमेश बगळे (रा. मुरबाड टेंबरे, ता. मुरबाड, जि. ठाणे) असे अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीचालक तरुणाचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृत रुपेश बगळे हा आपल्या सफेद रंगाची यामाहा R15 (क्र. MH 05 GK 0960) ही दुचाकी घेऊन भीमाशंकर रोडने जात होता. शिनोली गावच्या हद्दीत नेवाळवाडी फाट्याजवळ पुलावरून जात असताना, वाहनाचा वेग प्रचंड असल्याने रुपेशचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. या वेगामुळे दुचाकी पुलाच्या डाव्या बाजूच्या सिमेंटच्या कठड्यावर जोराने जाऊन धडकली. रुपेश दुचाकीसह पुलावरून थेट खाली पाण्यात कोसळला. गंभीर आणि किरकोळ स्वरूपाच्या जखमा झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात दुचाकीचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. याप्रकरणी मृत रुपेशचा मामा शंकर विठ्ठल वळवे (वय २५, रा. पिंपळगाव घोडे, ता. आंबेगाव) यांनी घोडेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## हुमणी अळी नियंत्रणासाठी कृषी विभागाकडून प्रकाश सापळ्याचे प्रात्यक्षिक

यवत (दै. संध्या)

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी विविध जनजागृती मोहिमा राबविण्यात येत आहेत. दौंडचे तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाणे, मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप आणि उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतीविषयक विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून दौंड तालुक्यातील बोराटेवस्ती येथे प्रगतशील शेतकरी समीर अशोक बोराटे व रामदास अशोक बोराटे यांच्या शेतावर 'हुमणी अळी नियंत्रण' या विषयावर विशेष प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते.



**शेतकऱ्यांना मिळाले प्रभावी तंत्र**

*यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी शेतकऱ्यांना हुमणी अळीच्या जीवनचक्राची शास्त्रीय माहिती देत, ती पिकांसाठी कशी घातक ठरते, याचे गांभीर्य पटवून दिले. हुमणीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर हा अत्यंत स्वस्त आणि प्रभावी उपाय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रकाश सापळ्यांकडे आकर्षित होणाऱ्या भुंग्यांचा नायनाट केल्यास पुढील हंगामातील पिकांचे मोठे नुकसान टाळता येते, असे त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले.*

तसेच प्रकाश सापळ्यांची कार्यपद्धती आणि ते लावण्याच्या योग्य वेळेबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये हुमणी नियंत्रणाबाबत मोठी जागृती झाली असून इतर ही शेतकऱ्यांनी आपल्या शेतात प्रकाश सापळे लावणार असल्याचे सांगितले. यावेळी बोराटेवस्ती गावच्या पोलीस पाटील नेहाताई बोराटे, मा.सरपंच बापूसाहेब गायकवाड, प्रवीण बोराटे सखाराम होले, भगवान बोराटे, समीर बोराटे, रामदास बोराटे यांसह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विभागाने दिलेल्या या तांत्रिक माहितीमुळे आगामी खरीप हंगामात हुमणीवर नियंत्रण मिळवण्यास शेतकऱ्यांना निश्चितच मोठी मदत होणार आहे. अशी भावना गावच्या पोलीस पाटील नेहाताई बोराटे यांनी बोलून दाखविली.

# देशाचा खरा विकासदर ७.७ नव्हे, तर केवळ २.७ टक्केच

## सरकारी आकडेवारी खोटी : माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा

पुणे (दै. संध्या)

देशाची खरी आर्थिक आकडेवारी समोर आल्याशिवाय अर्थव्यवस्थेचे योग्य विश्लेषण आणि अचूक धोरणनिर्मिती करणे शक्य नाही. सद्यस्थितीत केंद्र सरकारकडून जनतेसमोर सादर केली जाणारी आकडेवारी दिशाभूल करणारी असून, देशाचा वास्तविक विकासदर ७.७ टक्के नसून केवळ २.७ टक्क्यांच्या आसपास आहे, असा खळबळजनक दावा भारताचे माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी केला आहे. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे येथे आयोजित "आजची भारतीय अर्थव्यवस्था" या विषयावरील विशेष चर्चासत्रात मुख्य वक्ते म्हणून ते बोलत होते.

यावेळी प्रारंभी काँग्रेस शहराध्यक्ष (पश्चिम विभाग) दीप्ती चवधरी यांनी यशवंत सिन्हा यांचे स्मृतीचिन्ह देऊन स्वागत केले. त्यांनी आपल्या स्वागतपर भाषणात वाढत्या महागाईवर चिंता व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे भाव वाढल्याने इंधन आणि गॅस महाग झाले असून गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावत आहे, असे त्या म्हणल्या.

या चर्चासत्राला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण अध्यक्षस्थानी होते.

आपल्या भाषणात यशवंत सिन्हा यांनी देशाच्या आर्थिक आकडेवारीच्या विश्वासार्हतेवर तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, "नोव्हेंबर २०२५ मध्ये जागतिक नाणेनिधीने भारताच्या आर्थिक आकडेवारी गोळा करण्याच्या पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत भारताला 'सी' ग्रेड दिली आहे. ही देशासाठी अत्यंत लज्जास्पद बाब आहे. वास्तविक परिस्थिती आणि सरकारी आकडेवारीमध्ये तब्बल ४ ते ५ टक्क्यांची मोठी तफावत आहे. जर मूळ आकडेवारीच चुकीची असेल, तर देशाची धोरणे कधीही योग्य प्रकारे तयार होऊ शकत नाहीत आणि त्यांची अंमलबजावणीही कोलमडते. हे सरकार कामाऐवजी केवळ प्रसिद्धी आणि प्रचारावर चालत असून, जनतेला खरी माहिती मिळणार नाही याची काळजी घेत आहे."



सिन्हा यांनी गेल्या १२ वर्षांतील आर्थिक स्थितीचा आढावा घेत सांगितले की, देशांतर्गत बचत आणि गुंतवणूक ही जीडीपीच्या ३३ टक्क्यांवर स्थिर आहे. सरकार २०४७ पर्यंत देशाला 'विकसित राष्ट्र' करण्याचे स्वप्न दाखवत आहे, परंतु विकसित देशाची कोणतीही स्पष्ट व्याख्या अस्तित्वात नाही. त्यासाठी दरवर्षी किमान ८ टक्के विकासदर आवश्यक आहे, जो सध्याच्या आर्थिक धोरणांमुळे अशक्य आहे. त्यातच कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) रोजगारावर विपरीत परिणाम होत आहे. नोटाबंदीचा एकही उद्देश सफल झाला नसून, बाजारातील ९९.९९ टक्के चलन बँकांमध्ये परत आले. काळ्या पैशाची एकही केस दाखल झाली नाही; उलट काही मोजक्या मित्रांसाठी काळा पैसा कायदेशीर करण्यात आला. गेल्या दोन वर्षांत देशात परकीय गुंतवणूक आली नसून उलट भारतीय नागरिकच सुरक्षित भवितव्यासाठी परदेशात गुंतवणूक करत आहेत.

कृषी क्षेत्राविषयी बोलताना ते म्हणाले की, 'एल निनो'च्या प्रभावामुळे मान्सून कमी होणार असून कृषी उत्पादनावर याचा विपरीत परिणाम होईल. ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडल्यास देशाच्या संपूर्ण अर्थकारणाला मोठा फटका बसेल. याशिवाय, अमेरिकेने भारतीयांवर लावलेल्या अतिरिक्त कराविरोधात भारताने जागतिक व्यापार संघटनेकडे कोणतीही तक्रार केली नाही. 'एपस्टीन फाइल्स' दाबण्याचे प्रयत्न सुरू असून, हा अहवाल पूर्णपणे समोर आल्यास भारतीय राजकारणात मोठे वादळ येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

